# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८ / चैत्र ६, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५७**

---

### म्हाडाच्या वांद्रे (मुंबई उपनगर) कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेकडे करोडो रूपयांची बेहिशोबी मालमत्ता सापडल्याबाबत

**(१) * ११६१८४ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या वांद्रे कार्यालयातील कार्यकारी अभियंता दीपक पवार यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या तपासात कोट्यवधीची संपत्ती असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पवार यांनी गैरमार्गाने रुपये ३ कोटी १६ लाखांची बेहिशोबी संपत्ती गोळा केल्याचे एसीबीच्या तपासात उघड झाले असून दिनांक १ जानेवारी, २००१ ते ३१ मार्च, २०१२ या कालावधीत एकूण उत्पन्नाच्या ६६.१० टक्के एवढी संपती जमा करून पत्नी व मुलीच्या नावे ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्री.पवार यांनी पदाचा दुरूपयोग करून ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता कमावलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचा तपशिल काय आहे व तद्नुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) आरोपी लोकसेवक दीपक पवार, तत्कालीन कार्यकारी अभियंता, म्हाडा, मुंबई (स्वेच्छा सेवानिवृत्त) यांचेविरूध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या उघड चौकशी मध्ये श्री.पवार यांनी दिनांक ०१.०१.२००१ ते ३१.०३.२०१२ या सेवा कालावधीत ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा ६६.०१% एवढी जादा अपसंपदा धारण केल्याचे निष्पन्न झाले असल्याने त्यांच्यावर तसेच त्यांच्या कुटूबियांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील विविध कलमान्वये दिनांक १३.०१.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन असून श्री.पवार यांनी यापेक्षा जास्त अपसंपदा धारण केली असल्याची बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईमधील पायधुनी येथे बेकायदेशीररित्या इमारतीचे बांधकाम सुरु असल्याबाबत

**(२) * १०५२७७ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमधील पायधुनी इस्माईल कर्टे रोडवरील सिटी सर्व्हे क्र.२५७६ या जागेवर बेकायदेशीररित्या ९ मजली इमारतीचे बांधकाम सुरु असल्याची बाब दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाच्या इमारत दुरुस्ती मंडळाच्या कार्यकारी अभियंते व अधिकाऱ्यांनी या इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली असता या ठिकाणी

तळ अधिक नऊ मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम चालु असल्याचे आढळल्यानंतर ही इमारत उपकर प्राप्त नसल्याने महानगरपालिकेच्या सी वॉर्डाच्या सहाय्यक आयुक्तांना नोटीस पाठवून सदर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात एमआरटीपीची कारवाई करण्याची सूचना केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी तुषार सालीयन यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असता मा.मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला या प्रकरणी प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बेकायदेशीर नऊ मजली इमारतीचे बांधकाम सुरु असताना व म्हाडाच्या कार्यकारी अभियंत्यांनी या बेकायदेशीर बांधकामाबाबत लेखी कारवाई करावी अशी सूचना देऊनसुध्दा सी वॉर्डाच्या सहाय्यक आयुक्तांनी संबंधीत बेकायदेशीर बांधकामा विरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, बेकायदेशीर बांधकाम सुरु झाल्यानंतर ते तातडीने न थांबवता कर्तव्यात कसूर व अक्षम्य विलंब केल्याबद्दल दोषींवर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पायधुनी इस्माईल कर्टे रोडवरील सिटी सर्व्हे क्रमांक २५७६ या जागेवर तळमजला+९ मजल्यांच्या इमारतीतील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.१०.२०१७ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस आदेश दिले आहेत.

(२) सदर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व एमआरटीपी कायद्यांतर्गत कारवाई करण्याची सूचना म्हाडा कार्यालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस केली होती हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक ६७/२०१७ मध्ये मा.न्यायालयाने, सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत दिनांक १३.१०.२०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते.

(४) व (५) सदर बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १६.११.२०१७ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४अ अन्वये बांधकाम थांबविण्याबाबत नोटीस बजावण्यात आली.

सदर नोटीशीविरोधात पक्षकाराने मा. दिवाणी न्यायालयात बी.सी.सी. सुट क्रमांक ६१८/२०१८ अन्वये दाखल केलेल्या दाव्यात मा. न्यायालयाने दिनांक ०३.०३.२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

• महानगरपालिकेने पक्षकारास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावावी.

• सदर बांधकाम प्रकरणी पक्षकाराने महानगरपालिकेस सादर केलेल्या कागदपत्रांची महानगरपालिकेने छाननी करावी.

• तद्नंतर सदर बांधकाम अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यावर दोन आठवड्यांनंतर कारवाई करावी.

सदर प्रकरणी मा.दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील सिडको प्राधिकरणाचे ८७ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत दोषी आढळून आल्याबाबत

**(३) * ११५६९२ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सिडको प्राधिकरणाचे ८७ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत लाच घेणे, अनियमितता व इतर गैरव्यवहारांच्या प्रकरणांत दोषी आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांची नावे काय आहेत व त्यांच्यावर कोणते आरोप ठेवण्यात आले आहेत तसेच गैरव्यवहाराचे गंभीर आरोप असलेल्या अधिकाऱ्यांना सिडकोने त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरही सेवेत ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सन १९८७ ते फेब्रुवारी, २०१८ पर्यंत ठाणे जिल्ह्यातील सिडको प्राधिकरणामधील अधिकारी, कर्मचारी तसेच खाजगी इसम अशा एकूण ८५ आरोपीविरुध्द लाच घेणे, अनियमितता, इतर गैर व्यवहार व अपसंपदा संपादीत करणे अशा तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कार्यवाहीमध्ये दोन आरोपी लोकसेवकांना माननीय न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा सुनावली आहे.
(२) आरोपी लोकसेवक श्री.दीपक प्रभाकर गवांदे, सहायक वसाहत अधिकारी व श्री. दिलीप जोमा म्हात्रे, लिपीक टंकलेखक यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम, १९८८ मधील कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झालेले आहेत.

सिडको येथील अनियमिततेच्या अनुषंगाने शासनाने नेमलेल्या श्री.डी.के. शंकरण समितीच्या अहवालानुसार श्री.विवेक मराठे यांना ५०००/- रूपये दंडाची शिक्षा देण्यात आली आहे. त्यानंतर त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांना कंत्राटी तत्वावर सिडकोच्या पणन विभागात सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. तथापी दिनांक १५.०२.२०१८ रोजी त्यांचे कंत्राट संपुष्टात आले आहे.
(३) व (४) लाच घेताना, अनियमितता व इतर गैर व्यवहार प्रकरणी व अपसंपदा प्रकरणी दाखल गुन्ह्यांच्या तपास करून तपासाअंती दोषारोप पत्र पाठविण्या इतका सबळ पुरावा असलेल्या प्रकरणातील लोकसेवकांविरुध्द सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले आहे.

-----------------

## जानू भोईर नगर, मालाड एसआरएअंतर्गत पुनर्विकासाचे काम पुर्ण करुन रहिवाशांना घरांचा ताबा देणेबाबत

**(४) * ११५३८५ श्री.नारायण कुचे (बदनापूर)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड परिसरातील कुरार व्हिलेजमधील जानू भोईर नगरातील रहिवाशांचे एसआरएअंतर्गत पुनर्विकासाबाबतचे काम ओमकार बिल्डर यांचेबरोबर सन २००७ मध्ये करार झाल्यानंतर सोपविण्यात आले व करारानंतर सन २०११ मध्ये विकासकाने रहिवाशांची घरे पाडल्यापासून सन २०१५ पर्यंत त्यांना घर भाडे दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कराराप्रमाणे सदरहू मूळ रहिवाशांना १८ महिन्यांत पुनर्विकास केलेल्या घरांचा ताबा देणे बंधनकारक असतानाही आजमितीस पुर्नविकासाचे काम पूर्ण झालेले नसून मागील २ वर्षापासून रहिवाशांना घरभाडे देणे थांबविले आहे त्यामुळे ओमकार बिल्डरच्या विरोधात झोपडीधारकांनी नगरविकास विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आदिंकडे मागील २ वर्षापासून सातत्याने तक्रारी केल्या असतानाही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी न्यायासाठी मंत्रालयात दाद मागण्यासाठी झोपडीधारक गेले असता पोलीसांनी त्यांना अटक केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ११ वर्षापासून एसआरए योजनेतून घरे बांधून देतो असे सांगून फसविणाऱ्या ओमकार बिल्डर विरोधात तक्रारी होऊनही शासनाने कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मालाड येथील जानू भोईर नगरातील झोपडपट्टी धारकांवर झालेला अन्याय त्वरीत दूर होण्याच्या दृष्टीने तसेच पुर्नविकासित घरांचा ताबा विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे. तथापि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पात्र निष्कासित झोपडीधारकास संक्रमण सदनिका किंवा त्याप्रित्यर्थ भाडे अनुज्ञेय आहे.
(२) व (३) दि ०१.०२.२०१८ रोजी शांताराम तलाव, मालाड, पुर्व, मुंबई येथील झोपडीधारकांनी मंत्रालयीन प्रवेशीका घेवून मंत्रालयात प्रवेश केला व अपर

मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या दालनासमोर श्रीमती विद्या नाईक यांचे नेतृत्वाखाली एकत्र जमा झाले व त्यांना पक्की घरे देण्याबाबत गृहनिर्माण विभागातील सह सचिव यांच्या दालनात चर्चा केली. मात्र त्यावर झोपडीधारकांचे समाधान झाले नाही. त्यांनी कार्यालयासमोर बसून धरणे व गोंधळ सुरु केल्याने त्यांना शांतता राखण्यास आवाहन करण्यात आले. मात्र ते ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने त्यांना मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असा मंत्रालय सुरक्षा विभागाचा अहवाल आहे.

सदर योजनेत एकूण पात्र २७७२ झोपडीधारकांपैकी २२९५ झोपडीधारकांचे पुनर्वसन पुर्ण झाले असल्याचा प्राधिकरणाचा अहवाल आहे. प्रश्नात नमूद तक्रारी या योजनेत ‘अपात्र’ ठरलेल्या झोपडीधारकांच्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एमएमआरडीएमार्फत माहूल (मुंबई) येथे बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(५) * १०६००६ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीएमार्फत माहूल (मुंबई) येथे बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींमध्ये महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे, घाटकोपर, विद्याविहार, कुर्ला, अंधेरी, पवई, महानगरपालिकेच्या एच पूर्वेकडील जलवाहिनी, तानसा जलवाहिनी अशा विविध भागातून स्थलांतरित करण्यात आलेल्या सुमारे ५००० कुटुंबांचे पुनर्वसन आतापर्यंत करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईच्या प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या घरांची दुरवस्था झाली असून निकृष्ट दर्जाचे बांधकाम तसेच देखभालीचा अभाव असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीज, पाणी टंचाई, फुटलेल्या सांडपाणी वाहिन्यांमुळे परिसरात पसरलेली दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव, मद्यपी टोळ्यांकडून महिलांची व मुलींची होणारी छेडछाड अशा वातावरणात लोक राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहूल गाव परिसरात असलेल्या १० ते १२ रासायनिक कंपन्यांमधून होणाऱ्या हानिकारक प्रदूषित घटकांमुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने उक्त ठिकाणी मुलभूत सेवा सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माहुलगांव येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या व महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या ४५ इमारती या महानगरपालिकेच्या विविध प्रकल्प बाधीत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत ५,०७७ सदनिका विविध प्रकल्पग्रस्तांना वितरीत करुन प्रत्यक्ष ताबा दिला आहे.

(३) सदर इमारती व परिसर राहण्यास योग्य असल्याबाबतचा निर्वाळा मा.सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीने सीपीसी क्रमांक ६२१/२०१५ मध्ये दिनांक २७.११.२०१५ रोजी दिला आहे.

(४), (५) व (६) सद्य:स्थितीत या इमारतींतील रहिवाशांना महानगरपालिकेमार्फत खालील सेवा व सुविधा पुरविण्यात येत आहेत :-

- २४ तास पाणी पुरवठा करण्यात येतो.
- रिलायन्स एनर्जीतर्फे २४ तास वीज पुरवठा करण्यात येतो.
- किटक नियंत्रण विभागामार्फत नियमितपणे धुम्र फवारणी केली जाते.
- इमारतींच्या परिसरातील कचरा महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या संस्थेमार्फत नियमितपणे उचलण्यात येतो.
- सार्वजनिक आरोग्य केंद्र व दवाखाना सुरु करण्यात आला असून २ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, सदर परिसरात आवश्यकतेनुसार आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते.

• महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत नियमितपणे आरोग्य सर्वेक्षण करण्यात येत असून, सदर सर्वेक्षणात तापाचे रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर वेळोवेळी उपचार केले जातात.

• इमारतींतील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी उभारण्यात आलेले मलनि:सारण केंद्राच्या दुरुस्तीचे काम कार्यान्वित असून जुलै, २०१८ अखेर पूर्ण होईल.

• सदर इमारतींमध्ये सदनिका वाटप केल्यानंतर आवश्यकतेनुसार किरकोळ दुरुस्तीची कामे वेळोवेळी करण्यात येतात.

• सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सदर इमारतींच्या सर्वंकष दुरुस्तीअंतर्गत स्थापत्य व विद्युत कामांकरीता महानगरपालिकेमार्फत रु. ३५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच या दुरुस्ती कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असून, दुरुस्तीची कामे मार्च, २०१८ अखेरपर्यंत सुरु करण्यात येणार आहेत.

• संपूर्ण इमारतींची एकवेळ दुरुस्ती करुन इमारतींचा ताबा सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात येणार आहे.

सदर ठिकाणी मद्यपि टोळक्यांकडून महिला व मुलींच्या छेडछाडीबाबत कोणतीही घटना किंवा गुन्हा दाखल असल्याची नोंद आर.सी.एफ. पोलीस ठाण्याच्या अभिलेखात आढळून आलेली नाही.

राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार माहुल येथील हवेची गुणवत्ता तपासणी व त्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबतचा अभ्यास नीरी व के.ई.एम. हॉस्पिटल यांचेमार्फत करण्यात येत आहे.

याबाबतचा अंतिम अहवाल प्रलंबित आहे.

-----------------

## ऐनवेल (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील मुलीचा मृतदेह नदी पात्रात आढळल्याबाबत

**(६) * १०४७४९ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐनवेल (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील कुमारी अंकिता जंगम ही रहात्या घरातून बेपत्ता होवून तिचा मृतदेह घरापासून ३-४ कि.मी. अंतरावरील नदीत मिळाल्याची घटना दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी काही संशयीत आरोपींना ताब्यात घेऊन नाममात्र चौकशी केली असून आरोपींच्या कबूली जबाबात अंकिताने आरोपीसमोर आत्महत्या केली असल्याचे सांगितले असून त्याच्या आधारे केवळ आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करुनआरोपींना कलम ३०६, ३४ अन्वये न्यायालयात हजर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने दिनांक १८ फेब्रुवारी, २०१८ रोजीपासून उपोषण केले जात असून त्यांनी याप्रकरणी सखोल चौकशीची मागणी केली असून तपास अधिकारी तपासात करित असलेले दुर्लक्ष, मृत मुलीचा व्हिसेरा जे.जे.रुग्णालयात तपासणीला पाठविण्याची नातेवाईकांनी मागणी केली असता तो खेडच्या शासकीय रुग्णालयात पाठविणे, अयोग्य कलमे लावून आरोपींना पाठीशी घालणे असे गैरप्रकार केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार आरोपींवर तसेच तपासात दिरंगाई करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, कुमारी अंकिता हिचा शोध घेत असताना दिनांक ३०.१२.२०१७ रोजी ऐनवली पेंढरीचा पुल येथे जगबुडी नदीच्या पाण्यात तिचा मृतदेह आढळून आला.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) ऐनवेल (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील कुमारी अंकिता सुनिल जंगम ही दि.२८.१२.२०१७ रोजी घरात कोणालाही न सांगता निघून गेल्यामुळे तिच्या आईने दि.२९.१२.२०१७ रोजी अंकिता लापता झाल्याची खबर दिल्याने खेड पोलीस ठाणे येथे लापता रजि.नं.६२/२०१७ अन्वये तक्रार नोंदविली आहे.

दिनांक ३०.१२.२०१७ रोजी ऐनवली पेंढरीचा पुल येथे जगबुडी नदीच्या पाण्यात तिचा मृतदेह आढळून आला. त्याबाबत खेड पोलीस ठाणे येथे आकस्मिक मृत्यू रजि.नं.६८/२०१७ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच मयतीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार सहा जणांविरुध्द खेड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.०१/२०१८ भा.दं.वि.सं. कलम ३०६, १७६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर गुन्ह्यातील सहा आरोपितांना तात्काळ अटक करण्यात आली आहे. त्यापैकी एक विधी संघर्षित बालक आहे. पाच आरोपींना मा.न्यायालयाने जामीनावर सोडले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अखिल भारतीय चित्रपट मंडळात आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याबाबत

**(७) * १०६३९१ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अखिल भारतीय चित्रपट मंडळात सन २०१० ते २०१५ या काळात मोठा गैरव्यवहार झाला असून कोल्हापूर विभागाच्या धर्मदाय उपायुक्तांना आर्थिक गैरव्यवहाराची त्वरित चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखा परीक्षकाने सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधी घेऊन अखेर धर्मादाय सहआयुक्तांकडे अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.

त्याचे कारण सी.ए.यांनी दि.०६/०६/२०१७ व दि.०७/०७/२०१७ रोजी चौकशी करणेकामी न्यासाकडे कागदपत्रांची मागणी केली होती तरीही कागदपत्रे न मिळाल्याने दि.२०/०७/२०१७ रोजी सी.ए.यांनी स्मरणपत्र काढून कागदपत्रांची मागणी केली होती. असे चौकशी अहवालात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच सी.ए.यांना वर्षअखेर असल्यामुळे चौकशी अहवाल सादर करण्यास विलंब झाला आहे.

(३) निरीक्षक चौकशी करुन अहवाल धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांचेकडे दाखल झाला आहे. सदर प्रकरणास किरकोळ चौकशी क्रमांक १६/२०१८ देण्यात आलेला आहे. सी.ए.निरीक्षक चौकशी अहवालाची पडताळणी केली असता आर्थिक गैरव्यवहार झाला आहे असे दिसते. दाखल अहवालावर तत्कालीन ट्रस्टी यांना नोटिस काढून त्यांचे म्हणणे घेवून उपरोक्त अहवालावर वेगळा आदेश लवकरात लवकर निर्गमित करण्यात येत आहे व त्याचा अहवाल तात्काळ सादर करण्यात येईल.

(४) विनाविलंब अंतिम आदेश देऊन कायद्याप्रमाणे कार्यवाही करुन गैरव्यवहार केलेल्या ट्रस्टीकडून अपहाराची रक्कम वसूल करण्याची कारवाई करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील फोर सिझन हॉटेलच्या मालकांनी केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(८) * ११२२३७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील फोर सिझन हॉटेल व अन्यत्र केलेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात महानगरपालिका अधिकाऱ्यांनी पाहणी करुन सदर बांधकामाबाबत नोटीस दिली असूनही सदर बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी कारवाई करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या विलंबाबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १२.१०.२०१७ रोजी केलेल्या पाहणीत, वरळी येथील फोर सिझन हॉटेलच्या तळघरात अंदाजे ४२५ चौ.मी. इतके अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले.

सदर अनधिकृत बांधकामास दिनांक २३.१०.२०१७ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली.

सदर नोटीशीच्या अनुषंगाने पक्षकाराने सदरचे अनधिकृत बांधकाम स्वत:हून निष्कासित केले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आचोळे (ता.वसई, जि.पालघर) येथे जिल्हाधिकाऱ्यांची बनावट सही व शिक्का वापरुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(९) * ११२६३४ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे आचोळे येथील सर्व्हे क्र. ६० या जागेवर जय जिनेंद्र बिल्डर्सचे भागीदार उमेश दत्तात्रय नाईक व इतर यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचा खोटा शिक्का व सही वापरुन बिनशेती

परवानगी बनवून राकेश कुमार वधावन या विकासकामार्फत यशवंत वैभव टॉवर या अनधिकृत इमारतीचे बांधकाम करुन सर्वसामान्य नागरीकांची व वित्तीय संस्थांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वापरण्यात आलेली बिनशेती परवानगी ही बनावट असल्याचे चौकशीमधून निष्पन्न झाल्याने सदर यशवंत वैभव टॉवरला दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्याची सूचना पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे यांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाला दिनांक २२ जुलै, २०१७ रोजी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने संबंधित विकासकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे आचोळे, ता.वसई जि.पालघर येथील स.क्र.६० या जमिनीवर यशवंत वैभव टॉवर ही इमारत उभी आहे. मा.विधान परिषद सदस्य यांनी दिनांक १५.०९.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना उक्त स.क्र.६० या जागेवर खोटा शिक्का व सही वापरुन बनावट बिनशेती परवानगी तयार केली असल्याबाबत तक्रार केली असून त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर/ठाणे यांनी तपासणी केली असता सदरची बिनशेती परवानगी बनावट असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. पोलीस निरिक्षक, तुळींज, पोलीस ठाणे यांनी दिनांक २२.०७.२०१७ च्या पत्रान्वये उपसंचालक, नगर रचना, वसई विरार महानगरपालिका यांना उक्त जमिनीवर दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणेबाबत कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी बनावट बिनशेती परवानगीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तपासून नियमानुसार संबंधितांविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल करणेबाबत उपविभागीय अधिकारी, वसई यांना जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १९.०३.२०१८ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

-----------------

## माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे राज्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना पुरविण्यात आलेल्या लॅपटॉप खरेदीतील गैरव्यवहार

**(१०) * १०६३६८ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे राज्यातील तलाठी व मंडळ अधिकारी यांना संगणकीय प्रणालीवर काम करण्यासाठी शासनाच्यावतीने लॅपटॉप खरेदी करुन पुरविण्याचा निर्णय दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कॉमनेट कंपनीची ६१,२५७ प्रतिनग दराची निविदा मंजूर झाल्याने प्रत्येक जिल्ह्याने ४० हजार रुपये प्रतिनग खर्च अपेक्षित धरुन आवश्यक तितक्या लॅपटॉपची खरेदी पूर्ण करण्याकरीता निधी जिल्हा नियोजन समिती मधून माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे सपुर्द केल्यानंतर २१ जिल्ह्यांना त्यांनी दिलेल्या निधी मधून कमी प्रमाणात लॅपटॉप मिळाल्याने या लॅपटॉप खरेदीची चौकशी करण्यात यावी अशी तक्रार माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच जिल्हा नियोजन समितीकडे नोंदविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्याने अडीच कोटी रुपये देऊन ६५० लॅपटॉप अपेक्षित धरले असताना त्यांना फक्त ३५५ लॅपटॉप मिळाल्याने व बाजार भावापेक्षा माहिती व तंत्रज्ञान विभागाने खरेदी केलेले लॅपटॉप महाग असल्याने १६ ते १७ जिल्ह्यांनी या मोहिमेत सहभागी होण्यास नकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मोहिमेत जे जिल्हे सहभागी झाले नाहीत त्यांनी प्रिंटरसह लॅपटॉप ३५ ते ४० हजारात खरेदी केले असून माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जास्त किंमतीत लॅपटॉप खरेदी करण्यामागची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, माहिती व तंत्रज्ञान विभागाने संपूर्ण राज्यातील लॅपटॉप खरेदीबाबतची माहिती घेऊन शासन स्तरावर लॅपटॉप खरेदीबाबतच्या निविदा काढल्या होत्या का, असल्यास, त्यात किती व्यक्ती व संस्थांनी भाग घेतला तसेच कॉमनेट कंपनीची निविदा स्विकारण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे व सर्वात जास्त किंमत देऊन लॅपटॉप खरेदी करण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शासन निर्णय क्र.मातंसं १७१६/प्रक्र.२८६/३९, दि.०९/८/२०१६ या परिच्छेद क्र. ३.३ प्रमाणे माहिती तंत्रज्ञान महामंडळ, माहिती तंत्रज्ञान विषयक संयंत्रे, साधन सामुग्री व सेवा पुरवठा करणारी एकमेव संस्था असेल. त्यानुसार मार्च, २०१७ च्या दरम्यान उक्त २१ जिल्हाधिकारी कार्यालयांनी त्यांच्याकडे जिल्हा नियोजनातंर्गत उपलब्ध निधी लॅपटॉप खरेदीसाठी महामंडळास वर्ग केला. तथापि, मार्च, २०१७ पर्यंत महामंडळाकडून विविध संगणक साहित्याचे निविदे मार्फतचे दर निश्चित झाले नव्हते. त्यामुळे उपलब्ध निधीच्या तुलनेत एकूण किती लॅपटॉप उपलब्ध करता येतील हे निश्चित झाले नव्हते. निविदे मार्फत दर निश्चित झाल्यानंतर एकूण नगांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी कार्यालये उर्वरीत निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयांना कळविले होते.

(२) महामंडळाने एप्रिल, २०१७ मध्ये निविदा प्रसिध्द केली होती. लॅपटॉप करीता लेनोव्हा, कॉमनेट सोल्युशन, एसर इंडिया, इटरमस सोल्युशन या चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी लेनोव्हा व कॉमनेट सोल्युशन या दोन तांत्रिकदृष्टया पात्र निविदांची आर्थिक निविदा उघडण्यात आली. त्यापैकी कॉमनेट सोल्युशनची लॅपटॉप इंटेल एन्ट्रीलेव्हल i३ करीता रुपये ६१,९०६/- ची निविदा न्युनतम ठरली. निविदे मार्फत प्राप्त लॅपटॉपचे मायक्रोसॉफ्ट इंन्स्टॉलेशन अधिक अॅन्टी व्हायरस याप्रमाणे प्रत्येकी एक नगाची किंमत ठरविण्यात आली. जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीनुसार लॅपटॉप खरेदीचे आदेश देण्यात आले तसेच उर्वरित निधी उपलब्ध करण्याकरिता महामंडळाने दि.२२.०८.२०१७ रोजी संबंधित जिल्हयांना कळविले. मागणी नोंदविलेल्या २१ जिल्हयांपैकी कोल्हापूर व पूणे व्यतिरिक्त इतर सर्व जिल्हयांनी मागणी केलेले लॅपटॉप स्विकारले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयांना एकूण ३८३९ लॅपटॉपचा पुरवठा करण्यात आला आहे.

(३) नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने लॅपटॉप स्विकारले असून तसेच प्रमाणित केले आहे.

(४) महामंडळाकडून पुरविण्यात आलेले लॅपटॉप अद्ययावत स्पेसिफिकेशन, मायक्रोसॉफ्ट इंन्स्टॉलेशन, ॲन्टी व्हायरस, पाच वर्षाची वॉरंटी व ऑन साईट सेवा इत्यादी बाबींनी परिपूर्ण असूनही सदरहू लॅपटॉप अत्यंत स्पर्धात्मक किंमतीत उपलब्ध करुन देण्यात आले.

(५) महामंडळाने एप्रिल, २०१७ मध्ये निविदा प्रसिध्द केली होती. लॅपटॉप करीता लेनोव्हा, कॉमनेट सोल्युशन, एसर इंडिया, इटरमस सोल्युशन या चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी लेनोव्हा व कॉमनेट सोल्युशन या दोन तांत्रिकदृष्टया पात्र निविदांची आर्थिक निविदा उघडण्यात आली. त्यापैकी कॉमनेट सोल्युशनची लॅपटॉप इंटेल एन्ट्रीलेव्हल i३ करीता रुपये ६१,९०६/- ची निविदा न्युनतम ठरली. त्यामुळे निविदेच्या अटी व शर्तीप्रमाणे कॉमनेट संस्थेला यशस्वी निविदाकार घोषित करण्यात आले.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०११ पर्यंतच्या बेकायदा झोपडपट्टीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पक्की घरे देण्याचा निर्णय

**(११) * १०५२१९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०११ पर्यंतच्या बेकायदा झोपडपट्टी धारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पक्की घरे देण्याचा निर्णय झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत मिळणाऱ्या घरांच्या क्षेत्रफळाची मर्यादा ३१५ चौ. फुट करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्यासंबंधीचे विधानसभा विधेयक क्रमांक ७८ विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दि.२० व २१ डिसेंबर, २०१७ रोजी पारित केले असून मा.राज्यपाल महोदयांमार्फत मा.राष्ट्रपती महोदयांच्या संमतीसाठी दि.७.२.२०१८ रोजी पाठविण्यात आले आहे. सदर विधेयकात यासंबंधीची तरतुद अंतःर्भूत आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत 'सर्वांसाठी घरे-२०२२' हे धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना ३० चौ.मी. इतक्या चटई क्षेत्राचे घर अनुज्ञेय करण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील निवासी सदनिकांच्या संदर्भात राज्य शासनाचे धोरण केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत असावे यासाठी राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिकांच्या अधिक आकारमानाच्या घरांच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक अहवाल (Impact Analysis) तयार करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.१०.०१.२०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीला अहवाल ३ महिन्यात शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी टॅब पासून वंचित राहिले असल्याबाबत

**(१२) * १०५२५१ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१५ मध्ये सुरु केलेली महत्त्वाकांक्षी टॅब योजना तिसऱ्याच वर्षी असफल झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी नववीचा बदललेला अभ्यासक्रम जुन्या २०१४ च्या अॅण्ड्रॉइड प्रणालीवर बसवणे शक्य नसल्याने महानगरपालिका प्रशासनाने सन २०१५ मध्ये दिलेले तीन वर्षाचे कंत्राट रद्द करून नव्याने १३ हजार टॅबसाठी निविदा काढली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टॅबच्या निविदांना मुदत वाढवूनही कोणतीही कंपनी पुढे न आल्यामुळे नववीच्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात टॅब मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सदर टॅब त्वरित विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने महानगरपालिकेला निर्देश देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये टेक्नो इलेक्ट्रॉनिक लिमिटेडमार्फत खरेदी केलेले एकूण ४३,८४३ टॅब निविदा प्रक्रियेत मागितलेल्या तांत्रिक तपशिलाप्रमाणे असल्याबाबत महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खात्री करण्यात आली होती.

तसेच सदर टॅब मधील बॅटरीबाबत बी.आय.एस. चे प्रमाणपत्र कंत्राटदाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केले होते.

सन २०१६-१७ मध्ये खरेदी केलेले टॅब इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. सदर टॅब सन २०१७-१८ मध्ये इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार होते. तथापि, इयत्ता ९ वी चा अभ्यासक्रम बदलल्याने सदर टॅब त्यांना न देता इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात आले.

इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांकरीता नव्याने १८,०७८ टॅब खरेदी करण्यासाठी दिनांक ०५.०७.२०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा काढण्यात आल्या. सदर निविदेस चार वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये टॅब वितरित करता आले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.
(४) व (५) इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी नव्याने १८,०७८ टॅब खरेदी करण्यासाठी दिनांक ०५.०७.२०१७ रोजी काढण्यात आलेल्या निविदेस चार

वेळा मुदतवाढ दिल्यानंतर, प्राप्त दोन निविदांपैकी लघुत्तम निविदाकारास दिनांक ०६.०२.२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सदनिकांची विकासकाने प्रकल्पबाधित नसलेल्या लोकांना विक्री केल्याबाबत

**(१३) * १०९५६४ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या के/पूर्व विभागातील न. भू.मा.क्र. ३४५, ३४८, ३५०, ३६४ आणि ३७१ मौजे-मोगरा या महापालिकेच्या भूखंडावर हरीनगर-शिवाजीनगर को.ऑप.हौ. सोसायटी या नावाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत ५३८ प्रकल्पबाधित सदनिका उपलब्ध होणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारत क्र.९ मधील प्रकल्पबाधित सदनिकांची विकासकाने योजनेशी संबंधित नसलेल्या बाहेरील लोकांना विक्री केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पबाधित सदनिका पुन्हा प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. प्रश्नांकित योजनेमधील इमारत क्र.९ संपूर्ण पुनर्वसन इमारत असून यामध्ये प्रकल्पबाधित सदनिका प्रस्तावित नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे. तसेच योजनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हसवड (ता.माण, जि.सातारा) येथील मल्टीपर्पज हॉल बांधकामाबाबत

**(१४) * ११४४५७ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसवड (ता.माण, जि.सातारा) येथील मल्टीपर्पज हॉल बांधकामासाठी नगरपरिषद म्हसवड यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी विशेष सभा घेऊन कन्सल्टींग फी म्हणुन अंदाजे रु. २८ लाख इतकी रक्कम श्री.पुरुषोत्तम पाटील यांच्या नावे दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना अशा पध्दतीची मान्यता न घेता मनमानीपणे कन्सल्टींग फी देण्यात आल्याने या प्रकरणामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन मनमानीपणे नगरपरिषदेच्या निधीचा गैरवापर करणाऱ्या मुख्याधिकारी म्हसवड व संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • म्हसवड (ता.माण, जि.सातारा) नगर परिषदेने दिनांक ०२.०६.२०१७ रोजी वृत्तपत्रात जाहीरात देऊन नगर परिषदेच्या विविध सार्वजनिक कामांसाठी (अ) Plan Estimete तयार करणे (ब) कामावर देखरेख ठेवणे व (क) कामाची बिले करणे या कामी अनुभवी वास्तुविशारदाकडून निविदा मागविली होती.

• नगर परिषदेस तीन निविदा प्राप्त झाल्या. पैकी श्री. पुरुषोत्तम पाटील यांच्या निविदेतील दर सर्वात कमी असल्यामुळे ती निविदा दि. २०.६.२०१७ रोजीच्या नगर परिषदेच्या विशेष सभेत मंजूर करण्यात आली. याच विशेष सभेत नगर परिषद बहुउद्देशीय हॉल बांधण्याच्या कामाची अंदाजपत्रकेही श्री. पुरुषोत्तम पाटील यांच्याकडून करुन घेण्यास व त्यांनी अंदाजपत्रके तयार करुन दिल्यावर त्यांना त्यासाठीची ५% फी अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

• सदर मान्यता दिल्यानंतर श्री.पाटील यांनी बहुउद्देशीय हॉलचे रु.४,९२,८४,३११/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक सादर केल्यावर त्यांना ५% दराने रु.२४,६४,२१६/- व त्यावरील सेवा कर रु,३,६९,६३२/- अशी एकूण रु.२८,३३,८४८/- एवढी रक्कम दि.११.८.२०१७ रोजी प्रदान करण्यात आली आहे.

(२) बहुउद्देशीय हॉलला तांत्रिक मान्यता मिळण्याचा प्रस्ताव दि.२२.८.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा यांना सादर करण्यात आला आहे. अद्याप तांत्रिक मान्यता मिळालेली नाही. तांत्रिक मान्यता मिळाल्यावर प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर करण्यात येईल.

(३) व (४) या प्रकरणी सकृत दर्शनी काही अनियमितता झाल्याचे दिसून आले असून त्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

## उसर्ली खुर्द (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत दीप मिलन विकासकाने केलेले अनधिकृत बांधकाम

**(१५) * १०५१६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उसर्ली खुर्द (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत मे.दीप मिलन इंटरप्रायझेस विकासकाने बांधलेल्या अनधिकृत इमारतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा करून नये अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास मा.पाणीपुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.दीप मिलन विकासकाला जिल्हाधिकारी रायगड १२ इमारतीचे परवानगी दिली असताना विकासकाने २६ बेकायदेशीर इमारतींचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांचा नवी मुंबई विमानतळ प्रभावीत क्षेत्र (नैना) मध्ये समावेश असून शासनाच्या अधिसूचनेनुसार नैना प्राधिकरणाची मंजूरी घेणे आवश्यक असताना सदर विकासकाने कोणतीही परवानगी न घेतल्यामुळे सिडको प्रशासनाने सर्व्हेक्षण करून सदर अनधिकृत इमारतींचे बांधकाम हटविण्याची नोटीसा विकासकाला दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मे.दीप मिलन विकासकाने उभारलेल्या २६ इमारतींना पाणी पुरवठा न करण्याबाबत तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा करीत आहे,
(५) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मे.दीप मिलन एंटरप्रायझेस या विकासकाने मौजे उसर्ली खुर्द येथील सर्व्हे क्र. १५०/१(१), १५०/(१)२, १५०/१(३) येथे १२ इमारतींची परवानगी असतांना २६ इमारतींचे बांधकाम केल्याबाबतची तसेच, बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्यामुळे सदरहू इमारतींची नळ जोडणी व विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबतचे निवेदन सिडकोस प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाची प्रत मा.मंत्री (पाणीपुरवठा) यांनाही अग्रेषित केल्याचे दिसून येत आहे.
(२), (३) व (४) नैना प्रकल्पासाठी दि.१०/१/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये सिडको विशेष नियोजन प्राधिकरण आहे. परंतू, विकासकाने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन १२ इमारतींसाठी परवानगी असतांना उर्वरित इमारतींसाठी सरपंच, उसर्ली खुर्द यांची परवानगी घेतल्याचे आढळून आले आहे.

सबब नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावीत अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या उसर्ली खुर्द या गावातील सदरहू अनधिकृत बांधकामाबाबत एमआरटीपी अधिनियम, १९६६ च्या कलम ५४ (२) अन्वये दि.४/२/२०१५ रोजी सिडकोमार्फत तसेच, सहायक नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नैना) यांचेकडून दि.१/१/२०१८ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम १५८(२) च्या अधिकाराचा वापर करुन शासन अधिसूचना दि.७/१०/२०१७ नुसार, दि.३१ डिसेंबर, २०१५ व तत्पूर्वी बांधलेली अनधिकृत बांधकामे 'प्रशमन संरचना' म्हणून घोषित करण्याकरीता तयार केलेल्या नियमात बसत असल्यास, त्याबाबत सिडकोच्या (नैना) बांधकाम परवानगी विभागाकडे अर्ज करण्याविषयी सिडकोने दि.१५/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये विकासकास कळविले आहे. प्रशमन संरचना नियमात न बसणा-या अपात्र अनधिकृत बांधकामाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालय साफसफाईच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१६) * १०९०७७ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेत नियमांचे उल्लंघन करुन कंत्राट मिळवणारा व कामचुकारपणा करणाऱ्या बीवीजी कपंनीच्या कंत्राटदाराला महानगरपालिकेचच अधिकारी पाठीशी घालत असून बीवीजी कंपनीला महानगरपालिकेच्या रुग्णालयात ५ वर्षासाठी स्वच्छतेचे कंत्राट नियमांचे उल्लंघन करुन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयत साफसफाईच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी करुन कारवाई

करण्याची तक्रार नागरिकांनी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांनी केलेल्या तक्रारीचे स्वरुप काय आहे व याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिका रूग्णालयांच्या दैनंदिन साफसफाईसाठी सन २०१५ मध्ये निविदा प्रक्रिया अवलंबून पात्र निविदाकार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना नियमानुसार ५ वर्षासाठी कंत्राट देण्यात आले होते, हे खरे आहे.

• रूग्णालयीन साफसफाईच्या कामात सदर कंपनीने निविदेतील अटी/शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना दंड आकारण्यात आला असून, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर कंपनीचा ठेका दि.१५.०३.२०१७ रोजी रद्द केला आहे.

• तथापि, कामाचे अत्यावश्यक स्वरूप विचारात घेता, पुढील व्यवस्था होईपर्यंत त्यांचे काम चालू ठेवण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे

• सदर कामाची नवीन निविदा काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) नवी मुंबई महानगरपालिकेत यांत्रिकी पध्दतीने रूग्णालयीन साफसफाईच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत, श्री.संजयकुमार सुर्वे यांनी दि.०४.०१.२०१८ रोजी मा.मुख्य सचिव यांचेकडे तक्रार केली आहे.

(३) प्राप्त तक्रारीत नवी मुंबई महानगरपालिकेत यांत्रिकी पध्दतीने साफसफाईच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे नमूद करून त्याची चौकशी होऊन संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्याची व जबाबदारी निश्चित करण्याची तक्रारदाराने मागणी केली आहे.

• सदर तक्रारीस अनुसरून आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचा अहवाल दि. ०९.०३.२०१८ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

• सदर अहवालावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांवर असलेल्या खंडणीच्या आरोपाची चौकशी करण्याबाबत

**(१७) * १०५२९८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवस्थापकीय संचालक, रस्ते विकास महामंडळ यांची बोरीवली येथील एका बिल्डरकडील जागेच्या व्यवहाराबाबतच्या निपटारा प्रकरणाची ध्वनीफित सामाजिक माध्यमांवर पसरल्याप्रकरणी मुख्य सचिवांच्या मार्फत चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, रस्ते विकास महामंडळ यांची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या संदर्भात मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री तसेच अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने करण्यात आलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित व्यवस्थापकीय संचालक, रस्ते विकास महामंडळ यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय. श्री.जॉनी जोसेफ, माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली.

(२) होय.

(३) चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार चौकशी समितीला नेमून दिलेल्या कार्यकक्षेच्या अनुषंगाने श्री.मोपलवार यांच्यावरील आरोपांची सत्यता निष्पन्न होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुलताबाद नगरपरिषेदेत (जि.औरंगाबाद) नागरी दलित वस्ती सुधार योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१८) * ११३४६६ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद नगरपरिषेदेला सन २०१६-१७ मध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ४८ लाख ८२ हजार २८ रुपये निधी एल.ई.डी. लाईटसाठी मंजूर झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांची प्रशासकीय मान्यता घेण्याआधी मंजूर कामांचे अंदाजपत्रकात सार्वजनिक बांधकाम विद्युतीकरण विभागाची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आसतांना नागरपरिषेदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या मेकॅनिकल विभागाकडून नियमबाहय मंजूरी घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दलित वस्ती नसलेल्या जागेवर खड्डे खोदून कोणतीही तांत्रिक तपासणी न करता दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास सुमारे १४ लाख रु. धनादेश ठेकेदारला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) खुलताबाद नगरपरिषद “क” वर्ग नगरपरिषद असून “क” वर्ग नगरपरिषदांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेण्याची मुभा आहे.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(३) व (४) नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत एल.ई.डी. लाईट दलित वस्तीतच उभारण्यात आले आहेत. सदर जागेच्या कामाच्या रेखांकन नकाशाला सहायक संचालक, नगररचना औरंगाबाद यांनी तांत्रिक मान्यता दिली असल्याबाबत खुलताबाद नगरपरिषदेने कळविले आहे.

• सदर प्रकरणी रु.१६,१०,३२२/- इतक्या रकमेची धावती बिले दि.२०.०५.२०१७ रोजी अदा करण्यात आली आहेत.

• सदर कामाबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद विद्युत विभाग यांच्याकडून तपासणी अहवाल प्राप्त करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण नगरपालिकेमध्ये (जि.रत्नागिरी) गत वर्षभरातील झालेल्या गैरव्यवहारांची चौकशी करण्याबाबत

**(१९) * ११३३९५ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपालिकेमध्ये (जि.रत्नागिरी) गत वर्षभरातील झालेल्या गैरव्यवहारांबाबत वारंवार तक्रारी होत असून चौकशीची मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार पुल कामाचे अतिरिक्त बिल, एल ई डी दिवे, ५८/२ अधिकाराचा गैरवापर, आचारसंहितेचा भंग, भुयारी गटार सर्व्हेक्षण कामावर कोट्यवधीचा खर्च, सभागृहातील ठराव परस्पर बदलणे आदिंबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे वारंवार तक्रारी दाखल करण्यात आल्या असून जिल्हाधिकारी यांनी विशेष समितीमार्फत तातडीने चौकशी करण्याचे आश्वासन शहर सुधार समितीला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी जिल्हाधिकारी, रत्नागिरी व शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.
(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी "त्रिसदस्यीय समितीद्वारे" चौकशी केली आहे.
• सदरहू चौकशी समितीचा अहवाल जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अभिप्रायासह शासनास प्राप्त झाला आहे.
• अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील मीनाताई ठाकरे नाट्यगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) * ११०७१० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील मीनाताई ठाकरे नाट्यगृह येथे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्वामी विवेकानंद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन सुरु असतांना खिडकी तूटून तीन विद्यार्थी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नाटयगृहाच्या दुरुस्तीकरिता अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम विभाग ३० ते ३५ लाख तर विद्युत विभाग २० लाखांची तरतूद करुन मागील २९ वर्षात एकही पैसा खर्च करता केवळ कागदावरच दुरुस्ती झाल्याचे दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नाटयगृहाच्या दुरुस्ती खर्चात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी करण्यात येणार आहे काय, तसेच या नाट्यगृहाच्या दुरुस्तीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १३.०१.२०१८ रोजी स्व.मिनाताई ठाकरे रंगायतन येथे स्वामी विवेकानंद स्कूल यांच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमा दरम्यान नाट्यगृहाची खिडकी पडल्याने खासगी वाद्यवृंद पथकातील तिन वादक किरकोळ जखमी झाले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) स्व.मिनाताई ठाकरे नाट्यगृहाच्या स्थापत्यकाम देखभाल दुरूस्तीसाठी रुपये ६८.३९ लाख इतका खर्च अद्याप पर्यत केला असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) अशा प्रकारच्या दुर्घटना पुन्हा होऊ नये याची खबरदारी घेण्याची सूचना आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेअंतर्गत प्रभाग क्र. ५ व १० मध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(२१) * ११५९६५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको महामंडळाने जाहीर केलेल्या सुचनापत्रामध्ये पनवेल महानगरपालिका (ता.पनवेल, जि.रायगड) प्रभाग क्र.५ मधील नगरसेवकाने बेलपाडा येथे पाच मजल्याचे अनधिकृत बांधकाम केल्याचे तसेच प्रभाग क्र.१० मधील नगरसेवकाने २३९ चौ.मी. चे अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तद्नुसार सदर नगरसेवकांना अपात्र ठरवून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

याप्रकरणी सिडको, नवी मुंबई यांच्यामार्फत श्री.शत्रुघ्न अंबाजी काकडे, सदस्य, प्रभाग क्र.५ अ यांनी बेलपाडा, भुखंड क्र. २९, से.०३ वर सुमारे २५० चौ.मी.चे अनधिकृत बांधकाम केले असल्याबाबत तसेच श्री.रविंद्र अनंत भगत, सदस्य, प्रभाग क्र.१० क यांनी कळंबोली येथील १ ई/१०, तलावाजवळ ३ खोल्यांचे अनधिकृत बांधकाम केल्याबद्दल महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) उक्त प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही पनवेल महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस जातप्रमाणपत्राव्दारे नोकरी मिळवून शासनाची फसवणुक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२२) * ११५१९८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जातीचे बोगस दाखले मिळवून सरकारी नोकऱ्या मिळवणारे सुमारे ११ हजार ७०० कर्मचारी व अधिकारी आढळून आल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी व मागासवर्गीय असल्याचे सांगून राखीव जागांवर सरकारी नोकऱ्या मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने नोकरीतून काढून टाकण्याचे आदेश जुलै, २०१७ मध्ये सर्व राज्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाची फसवणुक करुन बोगस जातप्रमाणपत्राव्दारे आरक्षित जागांवर नोकरी मिळविणाऱ्यांविरूद्ध कारवाई तसेच त्यांच्याकडून वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या निर्णयाद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासन सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतुदीशी विसंगत ठरते. असा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने राज्याचे महाअधिवक्ता यांचे मत घेण्यात आले असून, निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात विविध ठिकाणी केबल टाकण्यासाठी रिलायन्स जीओ कंपनीला रस्ते खोदकाम करण्यास परवानगी दिल्याबाबत

**(२३) * ११४७८८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात विविध ठिकाणी केबल टाकण्यासाठी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान रिलायन्स जीयो कंपनीला रस्ते खोदकाम करण्यास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिलायन्स कंपनीकडून नव्या खोदाई कामासाठी परवानगी देताना आवश्यक ते शुल्कही कंपनीकडून भरून घेण्यात आले नाही तसेच कंपनीने परवानगीपेक्षा जास्त कि.मी रस्त्याची व पिट्सची खोदाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकीदार असलेल्या टेलीकोम कंपन्यांपैकी एक असलेल्या रिलायन्स कंपनीला पुन्हा थकबाकी भरून न घेता तसेच कर विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता परवानगी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कंपनीकडून सुरु असलेली खोदाईचे काम तात्काळ थांबून सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जमीनीखाली सेवा वाहिन्या असल्यामुळे, तसेच काही ठिकाणी काँक्रीट रस्ता असल्याने खोदाईचा मार्ग बदलावा लागला असून जागेवरील परिस्थितीनुसार सदर कंपनीकडून दिलेल्या परवानगीशिवाय एकूण ४१० मी. जास्त लांबीची खोदाई करण्यात आली आहे.

सदरच्या ज्यादा खोदाईसाठी खोदाई दराच्या तीनपट म्हणजेच रू.६२.११ लक्ष एवढा दंड पुणे महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आला असून सदर रकमेचा भरणा करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कोषागारात मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम यांनी ५९२ कि.मी. रस्ते खोदाईच्या कामाकरीता रू.३४०.३१ कोटी एवढी रक्कम अदा केली असून दुसऱ्या टप्प्यामध्ये रू.१४.७८ कोटी एवढी रक्कम पुणे महानगरपालिकेत अदा केली आहे.
(३) मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम यां कंपनीचे एकूण १७७ मोबाईल टॉवर पुणे शहरात असून त्यापैकी १०० टॉवर्सची रू.३८.६४ कोटी एवढी थकबाकीची रक्कम सदर कंपनीने पुणे महानगरपालिकेत भरणा केलेली आहे.

उर्वरित रू.१२.५८ कोटी एवढ्या थकबाकीबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत प्रशासकीय कार्यवाही सुरू असून कार्यवाहीअंती उर्वरित थकबाकीची रक्कम निश्चित करून सदर रक्कम वसूल करण्याचे प्रायोजन आहे.

मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम यांना पुणे महानगरपालिकेचे कर आकारणी व संकलन विभागाने १०० मोबाईल टॉवर्सची थकबाकी शिल्लक नाही असे पत्र दिलेले आहे.

त्यास अनुसरून सदर कंपनीस खोदाई करण्यास पुणे महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम या कंपनीकडून सुरू असलेले खोदाईचे काम तात्काळ थांबविण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून पत्रव्यवहार झालेला आहे. हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेंतर्गत बेकायदेशीर कत्तलखाने सुरु असल्याबाबत

**(२४) * १०५५०५ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पोलीस आयुक्तालय अंतर्गत भद्रकाली पोलीस स्टेशन हद्दीत नागरी वस्तीत बेकायदेशीर कत्तलखाने सुरु असल्याने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी राजवाडा परिसरात रक्त मिश्रित पाणी पुरवठा झाल्याने स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी ह्याच भागात रक्त मिश्रित पाणी पुरवठा झालेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर कत्तलखाने सुरु करणाऱ्यावर व याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवार कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी आयुक्त नाशिक महानगरपालिका यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११/०१/२०१८ रोजी जुन्या नाशिक भागात रक्तमिश्रीत पाण्याचा पुरवठा झाल्याबाबत व बेकायदेशीर कत्तलखान्याबाबत दिनांक १२/०१/२०१८ रोजी महानगरपालिकेकडे तक्रार केली होती.

तथापि, जुन्या नाशिक भागातील भद्रकाली पोलीस स्टेशन हद्दीतील क्षेत्राची महानगरपालिकेमार्फत दिनांक २६/०२/२०१८ रोजी पाहणी करण्यात आली असून, या भागात बेकायदेशीर कत्तलखाने सुरु नसल्याचे आढळून आले आहे असे, नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) जुन्या नाशिक भागातील भोई गल्ली परिसरात पाईपलाईन खराब झाल्याने दिनांक २३.१२.२०१६ रोजी दूषित पाणी पुरवठा झाला होता, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेमार्फत तातडीने या भागातील खराब झालेली पाईपलाईन बंद करण्यात आली. तसेच या भागात अन्य पाईपलाईन मधून स्वच्छ पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता.

(३) व (४) • पाणी पुरवठ्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या पाहणीत, महानगरपालिकेच्या पाणी वितरण वाहिनीवरुन दिलेले नळ जोडणीचे पाईप सडले असल्याचे निदर्शनास आले.

• त्यामुळे पाण्याच्या वितरण वाहिनीत ड्रेनेजच्या पाण्याचा शिरकाव झाल्याने राजवाडा परिसरात दिनांक ११/०१/२०१८ रोजी दूषित पाणीपुरवठा झाल्याचे आढळून आले.

• महानगरपालिकेमार्फत तात्काळ त्या भागातील पाणीपुरवठा थांबवून जुनी पाईपलाईन दिनांक १३/०१/२०१८ रोजी बदलण्यात आली व स्वच्छ पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

• दरम्यानच्या कालावधीत टँकरव्दारे नागरीकांना पाणीपुरवठा करण्यात आला

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहीम (मुंबई) येथील भागेश्वर भुवन पुनर्विकासात मे. सगुण बिल्डर्स यांनी रहिवाशांची केलेली फसवणूक

**(२५) * ११०१२२ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील भागेश्वर भुवन इमारतीच्या पुनर्विकासात विकासक मे. सगुण बिल्डर्स यांना दिनांक ५ जून, २०१५ मध्ये वि.नि.नि. ३३(७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर पुनर्विकासाचे काम ५ ते ६ वर्ष प्रलंबित आहे व विकासकाने भाडे देणे ही बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाकडून भाडेकरू / रहिवाशी यांना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन इमारत रिकामी करून घेण्यात आली होती परंतु मागील २ ते ३ वर्षापासून पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडे ही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व तदनंतर पुनर्विकासाचे काम पुर्ण करण्याकरिता विकासकाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अशंतः खरे आहे.

सदर इमारतीच्या पुनर्विकासाचे काम धिम्या गतीने सुरु आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

विकासकाने मागील १ वर्षापासून भाडेकरू/रहिवाशी यांना भाडे देत नसल्याबाबतच्या तक्रारी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

(३) याबाबत मुख्य अधिकारी, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मुंबई यांनी दि.२३.०५.२०१६ रोजी मा.आमदार श्री.सदा सरवणकर यांच्या उपस्थितीत भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांची संयुक्त बैठक घेतली होती. तथापि, सदर बैठकीस भाडेकरु / रहिवाश्यांतर्फे कोणीही हजर झाले नाही. यावेळी विकासकातर्फे हजर असलेल्या प्रतिनिधींनी उपकर प्राप्त इमारतीतील

भाडकरू/रहिवाश्यांना पर्यायी जागेचे भाडे नियमितपणे देण्यात येते व त्याबाबत रहिवाश्यांची कोणतीही तक्रार नाही, असे सांगितले.

तथापि, मागील १ वर्षापासून विकासक भाडेकरु/रहिवाशी यांना भाडे देत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता/ ग- उत्तर विभाग, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या कार्यालयास तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत कार्यकारी अभियंता/ग-उत्तर विभाग, दुवपु मंडळ यांच्यामार्फत विकासकास थकीत भाडे देण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच भाडेकरु/ रहिवाश्यांचे थकीत भाडे देण्याबाबत मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांच्या दालनात सर्व भाडेकरु/ रहिवाशी व विकासक यांची दि.१५.०३.२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली-मिरज-कुपवाड (जि.सांगली) महानगरपालिका हद्दीत केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(२६) * ११६४१६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज-कुपवाड (जि.सांगली) महानगरपालिका हद्दीत इंदिरानगर, मिरज, संजयनगर, मिरज, आबानगर सांगली इत्यादी ठिकाणी केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाच्या बांधकामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पात अनेक त्रूटी व बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत तक्रारी मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचेकडे करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी गृहप्रकल्पाची मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण महोदयांनी प्रत्यक्षात केलेल्या पाहणीत

गृहप्रकल्पातील घरकुलांचे काम पूर्ण झालेले नसल्याचे व झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू घरकुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड शहर नगरपालिका, सांगली व जिल्हा प्रशासनास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, घरकुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण झाल्यानंतर अहवालातील त्रुटींच्या दुरुस्त्या करून घरकुलांकरीता आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा तात्काळ पुरवून बांधकामाची उचित गुणवत्ता राखून घरकुलांचे वाटप व ताबा लाभार्थ्यांना देण्याबाबतचे आदेश देऊनही मा.राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशांची पूर्तता न करता लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करुन लाभार्थ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी शासनाने तातडीने सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मिरज शहरातील संजय नगर व इंदिरानगर आणि सांगली शहरातील धोत्रे आबा झोपडपट्टी येथील घरकुलाच्या बांधकामास राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी दि.२२/११/२०१७ रोजी भेट दिली.

• सदर भेटीवेळी घरकुल बांधकामाचे काम निकृष्ट झाले असल्याचे मत त्यांनी व्यक्त करुन, झालेल्या घरकुल बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची सूचना महानगरपालिकेस केली, हे खरे आहे.

(५) व (६) महानगरपालिकेने सदर कामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याकरीता "स्ट्रक्टवेल डिझायनर्स ॲन्ड कंन्सलटंट प्रा.लि., नवी मुंबई" या कंपनीची नेमणूक केली आहे.

• इंदिरानगर, मिरज व धोत्रे आबा झोपडपट्टी, सांगली येथील घरकुल लाभार्थ्यांना वाटपपत्र देण्यात आले आहे. तथापि, अद्यापी घरकुलाचा ताबा देण्यात आला नाही.

• घरकुलाचे संपूर्ण बांधकाम झाल्यानंतर झालेल्या बांधकामांच्या गुणवत्तेची चाचणी करुनच लाभार्थींना घरकुलाचा ताबा देण्यात येणार आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## नागपूर शहरातील एसआयटीने ९२३ प्रकरणे प्रलंबित ठेवल्याबाबत

**(२७) * १०५८५५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील भूमाफियांविरोधात कारवाई करण्यासाठी राज्य शासनाने शहर पोलीस दलातंर्गत विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थापना करून त्यात आठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्याकडे १ हजार ६७० तक्रार अर्ज प्राप्त झाले असता त्यापैकी ९२३ तक्रारींवर कोणतीच कार्यवाही न करता प्रलंबित ठेवण्यात आले असल्याची गंभीर माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादारम्यान निर्दशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आलेल्या ४७ तक्रारी गंभीर स्वरूपाच्या असतांनाही सदर तक्रारीचे प्रकरण देवान घेवाणाच्या समेटांनी निपटविण्यात आले असल्याची चर्चा असून त्याचप्रमाणे ९२३ प्रकरणे चौकशी न करताच समेटाच्या माध्यमातून प्रलंबित ठेवण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर शहरामध्ये एसआयटी कार्यरत आहे काय वा बरखास्त करण्यात आली आहे ,

(५) तसेच, उक्त प्रलंबित प्रकरणाची चौकशी करून संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सह पोलीस आयुक्त, नागूपर शहर यांचे आदेश दि.२७/४/२०१७ अन्वये विशेष तपास पथकाची (एसआयटी) ची स्थापना करण्यात आली होती. सदर पथकात आठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

एसआयटीचे विकेंद्रीकरण करुन सदर प्रलंबित ९२३ अर्ज पुढील कार्यवाही करण्याकरीता परीमंडळीय पोलीस उप आयुक्त, यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे. सदर अर्जाची चौकशी परीमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन स्तरावर चालू आहे.

(३) हे खरे नाही.

९२३ आर्जची चौकशी न करताच समेटाच्या माध्यमातून प्रलंबित ठेवण्यात आले नसून एसआयटीचे विकेंद्रीकरण झाल्याने ते परीमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन निहाय चालू आहे. ४७ पैकी ३२ अर्ज बाहेरील जिल्ह्यातील असल्याने संबंधित पोलीस अधीक्षक यांना पाठविण्यात आले. १२ अर्ज चौकशीच्या अंतीम टप्प्यात असल्याने गुन्हे शाखा येथे चौकशीवर प्रलंबित आहेत.

(४) एसआयटी सध्या कार्यरत नसून तिचे विकेंद्रीकरण करण्यात आले असून अर्जाच्या चौकश्या परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली चालू आहे.

(५) प्रलंबित ९२३ अर्ज पुढील कार्यवाही करण्याकरीता परीमंडळीय पोलीस उप आयुक्त, यांचेकडे वर्ग करण्यात आले. त्यापैकी २३२ अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत उर्वरित अर्जांची चौकशी सुरु आहे.

-----------------

## कोल्हापूर शहरातील ब्रिटीश कालीन पुलांचे जतन, संवर्धन व मजबुतीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत

**(२८) * १०६३३७ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील फुलेवाडीकडून गगनबावडा कडे जाणारा पूल, जयंती नाल्यावरील पूल, विल्स्न पूल, दसरा चौक ते व्हिनस कॉर्नरकडे जाणाऱ्या रस्त्यापरील पूल, गोखले कॉलेज चौक ते आईच्या पुतळ्याकडे जाणारा पूल या ब्रिटीश कालीन असलेल्या पुलांचे संवर्धन व मजबुती करण करणेसाठी रू.४ कोटीं निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रंलबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक असलेल्या पुलांवरुन अतिवृष्टी झाल्याने वाहतूक करणे धोक्याचे होणार असल्याचे बाब स्टक्टवेल डिझाईन व कंन्स्ल्टंटस या कंपनीने केलेल्या स्ट्रकचरल ऑडीट ने समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धोकादायक ब्रिटीशकालीन पुलांच्या संवर्धन व मजबुतीकरण करण्यासाठी लागणारा निधी देणेबाबत कोणती उपाययोजना केली गेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ब्रिटीश कालीन पुलांचे संवर्धन व मजबुतीकरणाकरीता निधी मिळणेबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, ही बाब खरी आहे.

(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेस विशेष निधी म्हणून रु. ६.४२ कोटी व पायाभूत सुविधेकरीता रु. २० कोटी वितरीत करण्यात आलेले आहे. प्रश्नाधीन ब्रिटीश कालीन पुलांचे कोल्हापूर महानगरपालिकेने स्ट्रक्टवेल डिझाईनींग ॲण्ड कन्स्ल्टंट प्रा.लि. यांचेकडून स्ट्रकचरल ऑडीट करण्यात आले असून, पुलांच्या मजबुतीकरणाचा रु.१.८३ कोटीचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला आहे. शासनाने यापूर्वी उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून अथवा महानगरपालिकेने स्व: उत्पन्नातून सदर पुलांचे मजबुतीकरण करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांचनवाडी (जि.औरंगाबाद) येथील जल व भूमी व्यवस्थापन संस्थेचे महासंचालक आणि सहसंचालक यांना लाच स्वीकारताना झालेली अटक

**(२९) * १०६६१७ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांचनवाडी (जि.औरंगाबाद) येथील जल व भूमी व्यवस्थापन संस्थेच्या वाल्मीचे महासंचालक आणि सहसंचालक यांनी तक्रारदार प्राध्यापकाकडून नेमुणकीच्या वेळी दिलेली शैक्षणिक आणि अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करणे गरजेचे असून यासाठी दहा लाख रुपयांची मागणी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महासंचालकांसह दोन आरोपींना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपींवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच तक्रारदार प्राध्यापकावरील अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी आरोपी लोकसेवक श्री.हा.का. गोसावी व श्री.आर.बी. क्षीरसागर यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून

त्यांना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे. याशिवाय श्री. हा. का. गोसावी व श्री.आर.बी. क्षीरसागर यांना शासन आदेश दिनांक २३.०१.२०१८ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## सोलापूर शहरातील उजनी धरण ते सोलापूर दुहेरी जलवाहिनींचा प्रस्ताव

**(३०) * १११९१२ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहराची पाण्याची गरज भागविण्यासाठी उजनी धरण ते सोलापूर दुहेरी जलवाहिनींचा ६९२ कोटींचा प्रस्ताव महानगरपालिका सभागृहापुढे आला असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वी हा प्रस्ताव १ हजार २४० कोटी रुपयांचा होता त्यात निम्म्यापेक्षा अधिक निधीची कपात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाला मंजूरी व निधीची तरतूद करुन शहराच्या पाणीपुरवठण्याचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • सोलापूर शहरास उजनी धरणातून पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने सोलापूर महासभेकडे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी ठेवला होता, हे खरे आहे.

(२) • सोलापूर शहराची सन २०५१ सालच्या लोकसंख्येसाठी पाण्याची गरज विचारात घेता रु. १२४० कोटी किंमतीची पाणीपुरवठा योजना सोलापूर महानगरपालिकेमार्फत सन २०१४ मध्ये तयार करण्यात आली होती.

• तथापि त्यानंतर सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर शहराची सन २०३३ सालच्या लोकसंख्येसाठी पाण्याची गरज विचारात घेऊन अंदाजे रु. ४४३ कोटी किंमतीचा डीपीआर तयार केला आहे.

(३) व (४) • सदर प्रकल्पास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली आहे.

• सदर प्रकल्पांची मंजूरी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## आय टी बिल्डिंगच्या (अंधेरी) मालकांनी व विकासकांनी एफएसआयचे व विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन केल्याबाबत

**(३१) * ११५३८३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी कुर्ला रोडवरील आय टी बिल्डिंग मालकांनी व विकासकांनी एफएसआयचे तसेच विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन केल्याबाबत श्री.शाह यांनी महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त व अन्य संबंधित अधिकाऱ्यांकडे सन २०१२ पासून लेखी तक्रार करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाविरोधात कोणतीही कारवाई न करता कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव के(पू) यांनी सदर अनधिकृत बांधकामास दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ रोजी ताबा प्रमाणपत्र(Occupation Certificate)दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या अनधिकृत बांधकामास डेझिग्नेट ऑफिसर के/पूर्व वार्ड यांनी एमआरटीपी कायद्यान्वये दिनांक २६ डिसेंबर २०१३ रोजी नोटिसा बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांविरोधात कोणतीही कारवाई न झाल्यामुळे श्री.शाह यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक २२.०७.२०१३ रोजी तक्रार प्राप्त झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) मरोळ गांव, अंधेरी (पूर्व) येथील मे. निळकंठ टेक पार्क प्रा. लि. या विकासकास अ, ब व क विंग असलेल्या माहिती तंत्रज्ञान इमारतीच्या बांधकाम प्रस्तावास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०.०८.२०१० रोजी अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.) व दिनांक २०.१०.२०१० रोजी जोत्यापर्यंतचे बांधकाम प्रमाणपत्र (सी.सी.) देण्यात आले.

त्यापैकी, विंग अ व ब मध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही याची खातरजमा करुन दिनांक ०५.१०.२०१२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर इमारतीतील अ व ब विंगला भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २०.१२.२०१३ रोजी करण्यात आलेल्या स्थळपाहणीत, अ व ब विंगमधील निचेस उपयोगात आणल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले.

त्यामुळे सदर इमारतीच्या विकासकास दिनांक २६.१२.२०१३ रोजी एम.आर.टी.पी. अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार नोटीस बजावण्यात आली.

तद्नंतर महानगरपालिकेमार्फत दिनांक ११.०७.२०१४ रोजी पुन:श्च पाहणी करण्यात आली व व दिनांक २६.१२.२०१३ रोजीच्या नोटीशीच्या अनुषंगाने दिनांक ०३.१२.२०१५ रोजी पोलीसांसमवेत अनधिकृत बांधकामाचा पंचनामा करुन, विकासकावर एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे एम.आर.टी.पी. अधिनियमाच्या कलम ५३(७), गु.र. क्रमांक २६७/२०१५ अन्वये एफ.आय.आर. नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर विकासकाने केलेल्या विनंतीनुसार, सदर भूभागाच्या वापरायोग्य ४८,५९५.०६ चौ.मी. क्षेत्रफळामधून १०१० चौ.मी. इतके क्षेत्रफळ, सदर निचेस अनधिकृतरित्या उपयोगात आणल्यामुळे दिनांक २७.१२.२०१६ च्या मंजूर नकाशामध्ये रोखून (होल्ड) ठेवण्यात आले आहे.

(४) अंधेरी कुर्ला रोडवरील आय.टी. बिल्डींगच्या मालकांनी व विकासकांनी एफएसआयचे तसेच विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन केल्याबाबत श्री.इफ्तेकार ए. शाह यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ०९.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली होती ही वस्तुस्थिती आहे.

(५) व (६) विकासकाने अद्यापी दंड व नियमन शुल्क भरलेले नसल्याने, संबंधित विकासक व वास्तुविशारद यांना महानगरपालिकेच्या प्रचलित दरानुसार व नियमानुसार दंड व नियमन शुल्क भरण्याबाबत दिनांक २६.०२.२०१८ रोजी कळविण्यात आले आहे.

-----------------

## श्रीगोंदे शहरात (जि.अहमदनगर) सुरु असलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३२) * १०७२३४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा शहरात ३३ कोटी रुपयांची सुरु असलेली १७ रस्त्यांची कामे नियमबाह्यरित्या व निकृष्ट प्रतीची झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत श्रीगोंदा नगरपरिषदेच्या रु.४०.४८ कोटी इतक्या किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास मार्च, २०१५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• सदर रस्ते विकास प्रकल्पात १७ रस्त्यांचा समावेश आहे.

• श्रीगोंदा नगरपरिषदेने सदर कामाचे कार्यादेश एप्रिल, २०१७ मध्ये दिले आहेत.

• सदर रस्त्यांची कामे निकृष्ठ होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी माहे जानेवारी ते मार्च २०१८ या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) • सदर रस्त्यांच्या कामांची त्रयस्थ तांत्रिक तपासणी अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्याकडून करण्याची कार्यवाही श्रीगोंदा नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

## ठाणे - नवी मुंबई मार्गावरील विटावा सबवे मार्गाच्या कामाबाबत

**(३३) * १०७०४२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे - नवी मुंबई मार्गावरील विटावा सबवे मार्गाचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दुरुस्तीचे काम सुरु असतांना वाहतूक कोंडी निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विटावा सबवेचे काम त्वरीत पुर्ण करुन रस्ता माहे डिसेंबर, २०१७ च्या तिस-या आठवड्यात वाहतुकीस खुला केला असता निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावरील संपूर्ण पेव्हर ब्लॉक काही वेळातच उखडल्याने पुन्हा मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी निर्माण होऊन वाहनधारकांना त्रास सहन करावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निकृष्ट दर्जाच्या कामा संदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे - नवी मुंबई मार्गावरील विटावा सबवे मार्गाच्या दुरुस्तीचे काम करणे आवश्यक असल्याने वाहतूकीस बाधा निर्माण होऊ नये याकरीता ठाणे महानगरपालिकेने विनंती केल्यानुसार वाहतूक शाखा, ठाणे यांना उक्त कालावधीत ठाणे-नवी मुंबई मार्गावरील वाहतूक ऐरोली मार्गे वळविली.

परंतु काही प्रमाणात वाहतूकीची कोंडी झाली ही वस्तुस्थिती आहे.

(२) पेव्हर ब्लॉक्स लावल्यानंतर लगेचच काही पेव्हर ब्लॉक्स उखडले ही वस्तुस्थिती आहे.

उक्त बाब निदर्शनास आल्याने तातडीने आवश्यक दुरूस्ती करण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

उक्त दुरूस्तीच्या वेळी वाहतुक लगतच्या मार्गीकेद्वारे सुरू ठेवण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

दोनपैकी एक मार्गीका बंद असल्याने उक्त रस्त्यावर काही प्रमाणात वाहतुक कोंडी झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) सदर कामाच्या दर्जाबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## पवई (मुंबई) येथील हिरानंदानी या विकासकाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याच्या अटींचे उल्लंघन करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(३४) * १०९२४४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील हिरानंदानी या विकासकानी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याच्या अटींचे उल्लंघन करुन उच्चभ्रुंसाठी मोठया क्षेत्रफळाची घरे बांधून केलेल्या गैरव्यवहाराची भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदयाखाली सखोल चौकशी करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे मा.विशेष न्यायालयायने, तपास अधिकारी विजयकुमार भोईटे यांना दिनांक ०८ जानेवारी, २०१८ रोजी निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार अद्याप शासनातर्फे सदरहू बंद केलेल्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली व त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, विशेष न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणाची भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ तील तरतुदीनुसार सखोल चौकशी करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिनांक ०४.०१.२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास दिले आहेत. या निदेशानुसार गुन्ह्यासंबंधी साक्षीदार तपासण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर शहर पोलीस दलातील शिपायाने एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(३५) * १०६४९६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर पोलीस दलातील पोलीस शिपाई रवी जाधव यांनी पोलीस गणवेशात बंदुकीचा धाक दाखवून एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने तपास केला आहे काय,

(३) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार आरोपी पोलीस शिपाई रवी जाधव यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदरचा गुन्हा करताना आरोपी पोलीस गणवेशात नव्हता.

(२) होय,

(३) फिर्यादीने तिच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराबाबत दिलेल्या तक्रारीवरून सोनेगाव पोलीस स्टेशन येथे अपराध क्र १६/२०१८ कलम ३७६, ४५२, ५०६(ब), ३२३ भादवि सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम ३(१)(१२) अनूसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अन्वये आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून त्याचे विरूध्द मा.न्यायालयात दोषारोप पाठविण्याची तजविज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मागाठाणे बोरिवली (पूर्व) येथील एसआरए योजनेमधील गैरव्यवहाराबाबत

**(३६) * ११२४२३ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवीपाडा, मागाठाणे, बोरिवली (पूर्व) मुंबई सी.टी.एस. नं.२१७/२१६/१ ते ५८, २१८ व २१८/१ ते ३२ या जागेवरील एसआरए योजनेमधील आजतागायत चालू असलेल्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६

नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणेशनगर, मागाठाणे रहिवाशी (एसआरए) सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्यादित सि.स.नं.१८२(१) पैकी १९१ येथील एसआरए योजनेत बनावट सभासदांच्या नावांचा समावेश करण्यात आला असून सद्यःस्थिती धनश्री डेव्हलपर्सने ही योजना सुर्या विकासकाला माहे नाव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे मागाठाणे, ता.बोरीवली, न.भू.क्र.१८२ (पै), १९१(पै) येथील गणेशनगर रहिवाशी (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण सोसायटी (नियो) या संस्थेसाठी मुंबई मंडळाने दि.९.९.२००५ रोजी परिशिष्ट-२ पारित केले आहे. सदर परिशिष्ट-२ तत्कालिन शासन निर्णय व नियमावलीच्या अनुषंगाने झोपडीधारकांच्या पुराव्यांच्या आधारे पारित करण्यात आले असल्याचा म्हाडा, मुंबई मंडळ यांचा अहवाल आहे. गणेशनगर रहिवाशी (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण सोसायटी (नियो) या संस्थेच्या सर्वसाधारण सभेत मे.धनश्री डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करुन नविन विकासक मे. सुर्या बिल्डर्स यांच्या नियुक्तीचा ठराव करण्यात आला. त्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अधिनियमाच्या कलम १३(२) नुसार दि.२३.१२.२०१६ रोजी मे.धनश्री डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करुन मे.सुर्या बिल्डर्स यांची नविन विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार दि.२३.२.२०१७ रोजी मंजूर करण्यात आलेल्या आशयपत्रामध्ये नविन विकासक मे.सुर्या डेव्हलपर्स यांचा उल्लेख झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केला आहे.

(३) विकासकामार्फत प्रकल्पबाधित सदनिका न देण्यात आल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदर योजनेच्या विक्री घटकास कुठलीही पुढील मंजूरी

दिलेली नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे. तसेच वैधानिक बाबी तपासून योजनेचे काम थांबविण्याविषयी सक्षम प्राधिकारी, मुंबई मंडळ यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पश्चिम) येथील इंदिरा नगर मधील शिवशक्ती को.ऑ.हौ.सो.लि. येथील पुर्नवसन योजनेबाबत

**(३७) * ११४९२२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी (पश्चिम) इंदिरा नगर मधील शिवशक्ती को.ऑ.हौ.सो.लि. येथील पुर्नवसन योजनेसाठी बनावट कागदपत्रे सादर करुन म्हाडाकडून परिशिष्ट-२ पारित करुन घेण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बनावट कागदपत्राच्या आधारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडुन एसआरए योजना मंजूर करुन घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अधिकारी, म्हाडा व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या विकासक मे. अनमोल अलायन्स व भागीदार तसेच सदर संस्थेचे कमिटी सदस्य यांच्यावर गुन्हा नोंदविण्याबाबत व सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अशा आशयाच्या तक्रारी म्हाडा, मुंबई मंडळास प्राप्त झाल्या असून सदर तक्रारींच्या अनुषंगाने छाननी करण्यात येत असल्याचा, म्हाडा, मुंबई मंडळाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नसल्याचा म्हाडा, मुंबई मंडळाचा अहवाल आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त दि.२८.११.२०१७ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ बाबत संस्थेकडून तसेच विकासकाकडून म्हाडा मुंबई मंडळ यांनी खुलासा मागविला असून, त्यांच्याद्वारे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त सदर निवेदन म्हाडा मुंबई मंडळाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे. माझगाव मजुर सहकारी संस्था मर्यादीत यांनी बनावट देयकाच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(३८) * १०९३६४ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. माझगाव मजुर सहकारी संस्था मर्यादीत काळाचौकी (मुंबई) यांनी करारनामा क्रमांक बी-१/ममुवि/२७११ दिनांक ९ फेब्रुवारी, २०११ व करारनामा क्रमांक बी-१/ममुवी/२७१२ दिनांक ९/२/२०११ नुसार काम न करताच दोन्ही कामे केले असल्याबाबत खोटी देयकाची लेखी पत्राव्दारे मागणी करून तपासणी अधिकाऱ्यांची दिशाभूल केली तसेच संस्थेच्या संबंधित नसलेल्या व्यक्तींची मदत घेवुन सदर बनावट देयके मंजूर करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांवर दबाव आणून शासकीय कामात अडथळा आणला तसेच १५ लाख ५ हजार ४८९ रूपयांची बनावट देयके सादर करून शासनाची फसवणूक केली असल्याची लेखी तक्रार सहायक अभिंयता माझगाव सेवा केंद्र सार्वजनिक बांधकाम विभाग, माझगाव यांनी दिंनाक २ जुन, २०१७ रोजी भायखळा पोलीस ठाणे, मुंबई येथे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी तक्रारीवरून भायखळा पोलीस ठाणेचे उपनिरीक्षकांनी पाच व्यक्तींच्या विरोधात विविध कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणातील आरोपींवर अघापही कोणतीही कार्यवाही झाली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी भायखळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १७८/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्हा तपासाधिन आहे.

सदर प्रकरणी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांसाठी सुरु केलेली १२.५ टक्के भूखंड वितरणाची योजना बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(३९) * १०५३३३ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांसाठी सुरु केलेली १२.५ टक्के भूखंड वितरणाची योजना बंद करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सिडको व्यवस्थापनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापी बहुतांश प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के भूखंडाचे वितरण झालेले नसतांना तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी गावठाणात बांधकामे केली आहेत त्यांना या योजनेसाठी अपात्र ठरविण्यात आले असून सदर बाब शासनाच्या विचाराधीन असतांना सर्व प्रकल्पग्रस्तांवर योजना बंद केल्याने अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व प्रकल्पबाधितांना भूखंडाचे वाटप होईपर्यंत उक्त योजना सुरु ठेवण्यात यावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे तालुक्यातील गावांचे लिंकेज सेक्टर एकत्रित करण्याचा व या तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांसाठी सुरु केलेली १२.५% भूखंड वितरण योजना बंद करण्याचा सिडको संचालक मंडळाने दि.११/८/२०१७ रोजीच्या ठराव क्र. ११९०८ अन्वये निर्णय घेतला आहे.

(२) सदरहू योजना ६० दिवसांत बंद करण्यात येणार असल्याबाबत सिडकोमार्फत दि.२२/९/२०१७ रोजी स्थानिक व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन प्रकल्पग्रस्तांना सूचित करण्यात आले आहे. सदर जाहिर नोटीशीस अनुसरुन प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांवर सिडकोमार्फत संचिकानिहाय कार्यवाही करण्यात येणार असून शेवटच्या भूधारकास भूखंडाचा लाभ मिळेपर्यंत ही योजना सुरु ठेवण्यात येणार आहे.

(३) व (४) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा आशयाचे दि.११/८/२०१७ रोजी निवेदन दिले असून सदर निवेदन सिडको यांच्याकडे उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचांदुर नगरपरिषद येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियानातील (नागरी) शौचालय योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४०) * ११३९६७ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदुर नगरपरिषद (ता.कोपरना, जि.चंद्रपूर) येथील अधिकारी व कर्मचारी व शौचालय लाभार्थी यांनी संगनमत करून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या (नागरी) शौचालय योजनेच्या रकमेचा गैरव्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचांदुर नगरपरिषदेने नियमबाहय पद्धतीने अनुदानाचे वाटप केले असल्याने या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • गडचांदूर नगरपरिषद कार्यक्षेत्रातील १५ लाभार्थ्यांना एकूण रक्कम रुपये ७२,०००/- इतके अतिरिक्त अनुदान वितरीत करण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

• सदर वितरीत करण्यात आलेल्या अतिरिक्त अनुदानाची रक्कम संबंधित १५ लाभार्थ्यांकडून वसूल करण्यात आली असल्याचे मुख्याधिकारी, गडचांदूर नगरपरिषद यांनी कळविले आहे.

• मुख्याधिकारी, गडचांदूर नगरपरिषद यांनी या प्रकरणी जबाबदार असलेल्या आरोग्य विभाग प्रमुखांना दिनांक ६/२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्याही सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्ते दुरुस्ती गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(४१) * १०४७९० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश**

**धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्ते दुरुस्ती गैरव्यवहारात आतापर्यंत ३४ रस्त्यांच्या कामाबाबतच्या चौकशी अहवालानुसार महानगरपालिकेच्या ९६ अभियंत्यांना दोषी ठरविण्यात आले तर चार अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले व उर्वरित २०० रस्त्यांच्या कामाबाबतचा अहवाल पंधरा दिवसात सादर होण्याची शक्यता असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात दोषी ठरविण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या अभियंत्यांसह जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कंत्राटदारांची नावे काळ्या यादीत टाकण्यात आली आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रस्ते दुरुस्ती गैरव्यवहारप्रकरणी टप्पा-१ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये १०० अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्रे बजावण्यात आली असून त्यापैकी ९६ अभियंते दोषी आढळले आहेत.

टप्पा-२ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये १६९ अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्रे बजावण्यात आली असून त्यापैकी १६७ अभियंते दोषी आढळले आहेत.

उपरोक्त दोन्ही चौकशीमध्ये ८४ अभियंते सामायिक आहेत.

(२) सदर सामायिक असलेल्या ८४ अभियंत्यांना दोन्ही टप्प्यांत केलेल्या चौकशीत जी जास्त शिक्षा असेल ती अंतिम करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततांबाबत १८५ अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांपैकी १८० दोषी कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या आहेत:-

| शिक्षेचे स्वरुप | दोषी कर्मचाऱ्यांची संख्या |
| --- | --- |
| सेवेतून काढून टाकणे | ०६ |
| पदावनत करणे | २३ |
| पुढील देय वेतनवाढ तीन वर्षांच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | १३ |
| पुढील देय वेतनवाढ दोन वर्षांच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | १७ |
| पुढील देय वेतनवाढ एक वर्षाच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | ६७ |
| पुढील देय वेतनवाढ एक वर्षाच्या कालावधीकरिता हंगामी स्वरुपात रोखून धरणे | ३१ |
| रु. १०,०००/- इतका दंड करणे | १६ |
| मूळ निवृत्तीवेतन काही कालवाधीकरिता कमी करणे/ निवृत्तीवेतनातून काही रक्कम काढून घेणे | ०६ |
| ठपका ठेवणे | ०१ |
| एकूण | १८० |

(३) सदर प्रकरणी ३ कंत्राटदार व २ सल्लागार यांना काळया यादीत टाकण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आळंदी (ता.खेड, जि.पुणे) येथील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(४२) * ११६३८७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी शहरात सुमारे रुपये ५ कोटी खर्च करून १० एमएलडी क्षमतेचा नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील नागरिकांना काळसर रंगाचे दुषित पाणी येत असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी यांचेकडे केल्याने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान खेड तालुक्याचे प्रांत तसेच महराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी जलशुद्धी केंद्राची पाहणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना दुषित व अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याची कारणे काय आहेत तसेच उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • तीर्थक्षेत्र विकास आराखडयातून या १० एम.एल.डी क्षमतेच्या जलशुध्दीकरण प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हे काम पूर्ण केले असून अद्याप सदर प्रकल्प नगरपरिषदेस हस्तांतरित करण्यात आलेला नाही.

• सदर प्रकल्प दि.२९.१२.२०१७ पासून कार्यान्वित झाला आहे.

(२) काळसर रंगाचे दुषित पाणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाहीत. खेड प्रांत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता व नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी जलशुध्दीकरण क्रेंदाची दि.१५.१२.२०१७ रोजी केलेली संयुक्त पाहणी ही या केंद्राच्या दि.२९.१२.२०१७ रोजी होणाऱ्या लोकार्पण सोहळयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी होती.

(३) नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाण्याची नियमित तपासणी करुन पाणी पिण्यास योग्य असल्याचे खात्री करुन घेण्यात येते, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण नगरपरिषदेचे (जि.रत्नागिरी) मुख्याधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४३) * १०५५७९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण नगरपरिषदेचे (जि.रत्नागिरी) मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांनी केलेल्या गैरव्यवहाराची व भ्रष्टाचाराची चौकशीची मागणी मा.पालक मंत्री, रत्नागिरी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने जिल्हाधिकारी यांना चौकशी करुन अहवाल पाठविण्यासंदर्भात कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची तक्रार पालकमंत्री, रत्नागिरी यांच्याकडून शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी "त्रिसदस्यीय समितीद्वारे" चौकशी केली आहे.
• सदरहू चौकशी समितीचा अहवाल जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अभिप्रायासह शासनास प्राप्त झाला आहे.
• अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बीकेसी येथील मुंबई क्रिकेट असोसिएशनने एमएमआरडीएची परवानगी न घेता करारनामा करुन जमिनीचा व्यावसायिक वापर केल्याबाबत

**(४४) * १११९३३ श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बीकेसी येथील लीजवर दिलेल्या जमीन प्रकरणात मुंबई क्रिकेट असोसिएशनने एमएमआरडीएची परवानगी न घेता मेसर्स शिर्के कंपनीबरोबर करारनामा करुन जमिनीचा व्यावसायिक वापर केल्याप्रकरणी मुंबई क्रिकेट असोशिएशन, मेसर्स शिर्के कंपनी तसेच अन्य संबंधित संस्थेच्या खात्यांचे आर्थिक लेखापरिक्षण करुन कारवाई करण्यात येईल असे एमएमआरडीने मुंबई क्रिकेट असोशिएशनला कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मागील सहा महिन्यांपासून अद्‌याप लेखापरिक्षकांची निवड करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वित्त व लेखा विभागामार्फत लेखा परिक्षकांची (Auditors Firm), संक्षिप्त सूची (Short List) अंतीम करण्यात आली आहे. त्यांच्याकडून वित्तीय देकार (Financial Quote) प्राप्त झाल्यानंतर लेखा परिक्षकांची नियुक्ती करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांना लाच घेताना केलेली अटक

**(४५) * ११६१८५ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागातंर्गत वर्ग १ च्या ठेकेदारांनी रस्त्याचे काम केले होते, या कामाचे देयक सुध्दा मंजूर झाले होते मात्र या बिलाच्या मोबदल्यात कार्यकारी अभियंता पद्माकर सुखदेवे यांनी ठेकेदाराकडून रुपये पाच लाखांची लाच मागितली असता त्यातील एक लाख रूपयांची लाच घेतांना कार्यकारी अभियंता पद्माकर सुखदेवे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.पद्माकर सुखदेवे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना लाचेची रक्कम स्विकारताना पकडण्यात आले असल्याने त्याच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १५.०२.२०१८ च्या आदेशान्वये त्यांना शासन सेवेतून निलंबीत केले आहे.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे डॉक्टर्स सोसायटीकरिता सिडको प्राधिकरणाकडून त्यांच्या अखत्यारितील भुखंड वितरीत करण्यात आल्याबाबत

**(४६) * ११५६९३ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे डॉक्टर्स सोसायटी करीता सिडको प्राधिकरणाकडून त्यांच्या अखत्यारितील भुखंड वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुखंडाचे वाटप करीत असताना अनियमितता आणि कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) व (३) कळंबोली ता.पनवेल येथे डॉक्टर्सनी स्थापन केलेल्या गृहनिर्माण संस्थेस सिडको महामंडळाकडून भूखंड वाटप केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी येथील परेल लोकसेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेतील १७३ झोपडीधारकांच्या पुनर्विकासाबाबत

**(४७) * ११५३९१ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील परेल लोकसेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेतील १७३ झोपडीधारकांनी पुर्नविकासाच्या करारानुसार काम दिलेल्या विकासकाने सन २०१२ मध्ये सर्व झोपडया तोडल्यात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तोडकामानंतर विकासकाने पहिले १८ महिने झोपडीधारकांना घरांना भाडे दिले मात्र सन २०१४ नंतर विकासकाने भाडे देणे संपूर्णत: बंद केले असून मागील ३ वर्षांपासून आजमितीस पुर्नविकासाचे काम सुरूच केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विकासकाने केलेल्या फसवणूकीबाबत सदरहू सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माणमंत्री, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आदींकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे सविस्तर तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू तक्रारीनंतरही आजमितीस सुमारे ८ महिन्यांचा कालावधी उलटूनही शासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्यामुळे सदरहू गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) कार्यालयावर मोर्चाही काढला आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, परेल लोकसेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांची फसवणूक करणाऱ्या सदरहू विकासकाविरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत

(६) असल्यास, सदरहू एसआरएअंतर्गत पुनर्वसनाचे काम विनाविलंब हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) प्रश्नांकीत संस्थेतील १७३ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१० मध्ये पारीत केले असून सदर योजनेच्या विकासकांनी विकास कामाकरीता सदर झोपड्या सन २०१२ मध्ये निष्कासित केल्या असल्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल आहे.

(२), (३) व (४) विकासकाने भाडे न दिल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विकासकाविरुध्द अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये कारवाई करुन मे.श्री.सदगुरु व डिलक्स जॉईंट व्हेंचर्स यांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रद्द केली असून नवीन विकासकाची नियुक्ती करण्याची संस्थेस मुभा दिली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आदेशाच्या अनुषंगाने विकासकाने शिखर तक्रार निवारण समितीकडे दि.१७.०२.२०१८ रोजी अपिल दाखल केले असून सदर बाब शिखर तक्रार निवारण समितीपुढे न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) सदर विकासकांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रद्द केली असून नवीन विकासक नेमण्याची मुभा संस्थेला देण्यात आलेली आहे.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्या मुळ विकास आराखडयात खाडाखोड करुन टीडीआर विकासकाला बेकायदेशीररित्या दिल्याबाबत

**(४८) * १०६३७३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या मुळ विकास आराखडयात खाडाखोड करुन सेवा-रस्ते गायब करुन ७५ हजार चौ.फूटांचा टीडीआर विकासकाला बेकायदेशीररित्या मान्य करणाऱ्या स्थानिक सर्व्हेयरचे महानगरपालिका आयुक्त व या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करुन मोक्का लावण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या विभागीय अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री ते पंतप्रधान या सर्वांना पत्र पाठवून तसेच वार्ताहर परिषद घेऊन केल्याची बाब दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने टी.पी.स्कीम १ मधील अंतिम भूखंड क्र.२०८-४ वर विकास प्रस्ताव क्र.एस-३/ढ/०१९/१६ हा न्यू वंदना गृहनिर्माण सहकारी संस्थेचा विकास प्रस्ताव मंजूर करताना ठाणे महानगरपालिका प्रशासनाने शहर विकास विभागासाठी असलेले शासन आदेश/परिपत्रके, महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली, शासनाची नगर भूमापन नियमावली इत्यादी नियम व अटींचा भंग केला असल्याच्या करण्यात आलेल्या तक्रारींबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अशा स्वरुपाची तक्रार शासनास दि.१६/११/२०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

(२) महानगरपालिका आयुक्तांनी सदर तारांकित प्रश्नांच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या टिपणीमध्ये उक्त विकास प्रस्तावांतर्गत अद्याप टिडीआर वापरण्यास मंजूरी देण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. उपरोक्त अनुक्रमांक (१) मधील तक्रार अर्जाचे अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेचा अहवाल दि. ३१/१/२०१८ च्या पत्रान्वये मागविण्यात आला आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विमानतळ प्रभावित क्षेत्राचा विकास तातडीने करण्याबाबत

**(४९) * १०६०९५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विमानतळ प्रभावित क्षेत्राचा (नैना) विकास करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपविली असताना सिडकोच्या उदासिन धोरणामुळे मागील पाच वर्षात २९२ पैकी फक्त ४२ प्रकल्पांनाच बांधकाम परवानगी देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने आदई, आकुर्ली, बेलवली, बोनशेत, बोर्ले, चिखले, चिपळे, डेरवली, देवद, कोळखे, कोन, कोप्रोली, मोहो, नेरे, पळस्पे, पालीखुर्द, पाली देवद, सांगडे, शिलोत्तर रायचूर, शिवकर, ऊसर्लीखुर्द, विचुंबे, विहीघर या २३ गावांचा स्मार्टसिटी म्हणून उभारण्याचा निर्धार केला असून पाच वर्षामध्ये एकही नोड विकसित केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैना परिसरामध्ये बांधकाम परवानगी देण्याची जबाबदारी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असताना प्रत्येक महिन्याला १५ ते २० परवानग्या दिल्या जात असताना सिडकोवर जबाबदारी सोपविल्यापासून बांधकाम परवानगी मिळणे कठीण होऊ लागल्यामुळे बांधकाम व्यावसायिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विमानतळ प्रभावित क्षेत्राचा विकास तातडीने करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) दि.१५/२/२०१८ पर्यंत नैना विभागाकडे २७९ (एमएसआरडीसी कडे सुपुर्द केलेले अर्ज वगळून) बांधकाम परवानगीसाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकुण ६२ अर्जांना बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र सिडकोकडून देण्यात आले आहे.

(२) नैना क्षेत्रामधील २३ गावांची अंतरिम विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाने दि.२७/४/२०१७ च्या अधिसूचनेन्वये मंजूर केली आहे. सदर मंजुर विकास योजनेची अंमलबजावणी नगर रचना परियोजनेमार्फत करण्याचे सिडकोने योजिले आहे.

(३) अशी वस्तुस्तिथी आढळून येत नाही. नैना क्षेत्राकरिता सिडको हे विशेष नियोजन प्राधिकरण आहे. सिडकोकडे प्राप्त होणाऱ्या विकास प्रस्तावांवर सिडकोकडून प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार निर्णय घेण्यात येते.

(४) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व शासनाच्या ईझ ऑफ डुईंग बिझनेसच्या सुचनेनुसार बांधकाम परवानगी जलद गतीने देण्यासाठी, बांधकाम परवानगी प्रक्रियेत सिडकोकडून सुधारणा करण्यात येत आहे. तसेच संगणीकृत बांधकाम परवानगी प्रणाली सिडकोकडून विकसित केली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ शहरातून जाणाऱ्या जव्हार-खोपोली या राज्य महामार्गामुळे होणारी वाहतूक कोंडी

**(५०) * १०९०८२ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ शहरातून जाणारा जव्हार-खोपोली हा राज्य महामार्ग सध्या शहरातील वाहतूक कोंडीचे जंक्शन ठरत असून, मात्र या रस्त्यासाठी एमएमआरडीएने ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करूनही मागील वर्षभरापासून या रस्त्याच्या सिमेंट कॉक्रिटीकरणाचे काम रखडले आहे, त्यामुळे रुंदीकरण करून २ वर्षाचा कालावधी होऊनही हा रस्ता तयार झाला नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेने २ दिवस ५०० कर्मचाऱ्यांची यंत्रणा आणि लाखो रुपये खर्च करूनही रस्तारुंदीकरणानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपालिका आणि एमएमएआरडीए यांच्या समन्वय अभावी हा रस्ता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मटका चौक ते फॉरेस्ट नाका या ३ कि.मी. च्या मार्गावर १००० अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली होती मात्र मागील ३ वर्षापासून रुंदीकरणानंतर रस्त्याचे काम मार्गी न लागल्याने संपूर्ण भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) जव्हार-खोपोली राज्य महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे जून, २०१२ मध्ये रुंदीकरण व दुरुस्तीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केला होता. सदर रस्त्यापैकी अतिक्रमणग्रस्त ५.३० कि.मी. भाग वगळून माहे मार्च, २०१५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्यात आला.

सदर महामार्गावरील अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील साईबाबा मंदिर ते फॉरेस्टनाका या ५.३ कि.मी. रस्ता अतिक्रमणाने बाधित होता. सदर रस्त्यातील मटका चौक ते फॉरेस्ट नाक्यापर्यंतची अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद व महसूल विभाग यांच्या संयुक्त कार्यवाहीत माहे मे, २०१५ मध्ये निष्कासित करण्यात आली. साईबाबा मंदिर ते रिलायन्स् पेट्रोलपंप दरम्यानची अतिक्रमणे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निष्कासित करण्यात आली. त्यानुषंगाने अतिक्रमणे निष्कासित केलेल्या

अतिरिक्त जागेमध्ये रस्ता रुंदीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग व अंबरनाथ नगरपरिषद यांच्याकडून प्राधिकरणाकडे मागणी प्राप्त झाली.

त्यानुषंगाने सदरचे काम नव्याने करणे आवश्यक असल्याने अतिक्रमण निष्कासित केलेल्या जागेमध्ये रस्ता रुंदीकरणाचे काम करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रु.३५ कोटीच्या प्रस्तावास दिनांक १६.०३.२०१७ रोजी मान्यता दिली असून सदर रुंदीकरणाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, कामाचे पर्यवेक्षण करणे इत्यादी कामांसाठी प्राधिकरणाने सल्लागाराची नेमणूक केली आहे. सद्यस्थितीत सदर कामासाठी निविदा मागविण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

-----------------

## खराडी (जि.पुणे) येथे पुणे महापौर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५१) * ११५११० श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराडी (जि.पुणे) येथे महानगरपालिकेच्या वतीने पुणे महापौर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन दिनांक ५ ते ९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महापौर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या आयोजनासाठी पुणे महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय तालीम संघाला १ कोटी २६ लक्ष रुपयांचा धनादेश अदा करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्पर्धेच्या आयोजनात तालीम संघाचे अध्यक्ष दामोदर टकले व एक विश्वस्त योगेश दोडके यांनी लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची लेखी तक्रार राष्ट्रीय तालीम संघाच्या इतर सर्व विश्वस्त व पदाधिकाऱ्यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे महापौर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या आयोजनात राष्ट्रीय तालीम संघाने निविदा प्रक्रिया न राबविता ठेकेदार नेमणे, ठेकेदारांना देयका पेक्षा ज्यादा रकमेचे देयक आदा करणे, स्वत:च्या वाहन चालक व काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावे नियमबाहय देयके काढून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत माहिती अधिकाराच्या आधारे मिळविलेल्या कागदपत्राद्वारे निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • पुणे महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय तालीम संघ, पुणे यांच्या सहकार्याने दि.५ ते ९ ऑक्टोबर २०१६ या कालावधीमध्ये महापौर चषक कुस्ती स्पर्धा कै.विठोबा मारूती पठारे स्टेडियम, खराडी येथे आयोजित करण्यात आली होती हे खरे आहे.
• महापौर चषक कुस्ती स्पर्धा आयोजनास व त्याप्रित्यर्थ झालेला प्रत्यक्ष खर्च रू.१,२६,५०,०१४/- एवढी रक्कम राष्ट्रीय तालीम संघ पुणे यांना अदा करण्यात आली आहे.
(३) • राष्ट्रीय तालीम संघ, पुणे यांचे विश्वस्त व अजिव सभासद यांनी दि.११.१.२०१८ रोजी याबाबत पुणे महानगरपालिकेकडे तसेच धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे.
• प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत धर्मादाय आयुक्त, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(४) व (५) • या प्रकरणी श्री.गुलाबराव सोनावणे व श्री.गोरख इखुले यांनी माहितीच्या अधिकारामध्ये दि.१३.९.२०१७ रोजीच्या अर्जान्वये पुणे महानगरपालिकेकडे माहिती मागितली होती हे खरे आहे.
• स्पर्धेसाठी झालेल्या खर्चाची देयके पुणे महानगरपालिकेच्या मुख्यलेखा व वित्त विभागाकडून तपासून घेवून राष्ट्रीय तालीम संघास देण्यात आलेली आहेत असे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

• स्पर्धेच्या आयोजनात आर्थिक गैरव्यवहार झाल्याप्रकरणी श्री.गुलाबराव सोनवणे यांनी धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडे तक्रार केलेली असून याबाबत धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडे चौकशी सुरू आहे.

• महापौर चषक कुस्ती स्पर्धेसाठी राष्ट्रीय तालीम संघ, पुणे यांचेकडून राबविण्यात आलेल्या कार्यपध्दतीबाबत व झालेल्या खर्चाबाबत चौकशी करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका व धर्मादाय आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील काकडी विमानतळाची शासकीय जमीन दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(५२) * ११३४५६ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील काकडी विमानतळाची शासकीय जमीन दाखवून ८०० गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक येथील सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हाचे स्वरूप काय आहेत तसेच सदर प्रकरणी किती व कोणत्या लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे

सदर गुन्ह्यात १३ गुंतवणुकदारांची फसवणुक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(२) सदर प्रकरणातील आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिर्डी या ठिकाणी आमचेकडे शेती आहे असे सांगून त्यांना बनावट ७/१२ उतारे दाखवून, त्यांच्याकडुन पैसे स्विकारले. त्याबदल्यात नोटरी साठे खत लिहुन देवून, पक्के खरेदी खत न करता एकूण रुपये २३,९५,०००/- ची फसवणूक केली आहे.

सदर प्रकरणी सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३८/२०१८ भा.दं.वि.क ४२०, ४६४, ४६५, ४६८, ३४ प्रमाणे दि. ३१/०१/२०१८ रोजी ५ आरोपींविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात अद्यापपावेतो ४ आरोपींना अटक करण्यात आलेली असून, १ आरोपी फरार आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## सोलापूर (जि.सोलापूर) महानगरपालिकेने शहरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीच्या नावाखाली निविदा न काढता निधी खर्च केल्याबाबत

**(५३) * १११९१४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (जि.सोलापूर) महानगरपालिकेने शहरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीच्या नावाखाली निविदा न काढता अत्यावश्यक बाब म्हणून रुपये ३.१३ कोटी खर्च केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचा आरोप झाल्यानंतर सदरहू प्रकरणी चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीच्या अहवालात ज्या दुरुस्ती कामासाठी खर्च झाला ते काम व त्याच्या दर्जेबाबत काहीही नमूद केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे मक्तेदार आणि संबंधित अधिकारी यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी फेर चौकशी करुन संबंधित दोषी मक्तेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • सोलापूर महानगरपालिकेने म.न.पा. हद्दीतील सार्वजनिक शौचालये वापरायोग्य होण्यासाठी (एकूण ४९२५ सिट्स) आवश्यक दुरुस्तीची कामे जुलै २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत केली.

• या कामांसाठी १४ व्या वित्त आयोगातून रु.३.१३ कोटी एवढा निधी खर्च करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांची जुलै, २०१७ मध्ये मान्यता घेण्यात आली.

• ही कामे सोलापूर महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर मक्तेदारांकडून करुन घेण्यात आली आहेत.

(२) स्थायी समितीच्या दि.१५.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त, विधान सल्लागार व मुख्यलेखापरिक्षक यांचा समावेश असणारी त्रिसदस्यीय समिती, सदर कामांपैकी किती कामे झाली, अद्याप किती कामे व्हावयाची आहेत, कामे एम.बी. मध्ये नोंदी केल्याप्रमाणे झाली आहेत किंवा कसे, याबाबत चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(३) हे खरे नाही.

समितीने एकूण ३.१३ कोटी रुपयांपैकी आतापर्यंत रु.१.८० कोटी एवढया रकमेची कामे (२४०० सिटस) तपासली आहेत. या कामात समितीस किरकोळ त्रुटी आढळून आल्या, ज्या समितीच्या दि.१५.०१.२०१८ च्या अहवालात नमूद केल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता मक्तेदारांकडून करुन घेऊन त्यानंतरच त्यांना देयक अदा करण्यात येत आहे. सदर समितीमार्फत उर्वरित कामांच्या तपासणीचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जुहू गाव (मुंबई) सेक्टर-२ मधील भूकर क्र. ४१ बी या भूखंडावर इक्वेस्टा या १० मजली इमारतीमध्ये बेकायदा व अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५४) * १०९२४७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू गाव (मुंबई) सेक्टर-२ मधील भूकर क्र.४१ बी या भूखंडावर इमारतीचे मालक आणि विकासक यांनी राबविलेल्या पुनर्विकास प्रकल्पात इक्वेस्टा या १० मजली इमारतीमध्ये बेकायदा व अनधिकृत बांधकाम करुन व मोठया प्रमाणात सार्वजनिक सुविधांच्या वापराच्या चटई क्षेत्राचा निवासीसाठी बेकायदा वापर करुन अनियमितता व गैरप्रकार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन दोषी इमारत मालक, विकासक व आर्किटेक्ट यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनातील मुद्दयाच्या अनुषंगाने शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जुहू गाव सेक्टर २ मधील भूकर क्र. ४१ बी या भूखंडावरील इमारतीच्या तळमजला आणि पोडीयमवर स्विमिंग पुलाचे आणि तळघरात स्वच्छतागृहाचे अनधिकृतपणे बांधकाम सुरु असल्याचे दिनांक २०.०३.२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या स्थळनिरीक्षणात निदर्शनास आले.

(२) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींचे डिसेंबर, २०१७ मधील लेखी निवेदन आढळून आले नाही.

(३) व (४) सदर अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४(अ) अन्वये दिनांक २०.०३.२०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली असून, महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नवी मुंबई ऐरोली सेक्टर-१५ मधील बाजार संकुलाच्या दुरवस्थेबाबत

**(५५) * १०५३४० श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ऐरोली सेक्टर-१५ येथील सिडकोने उभारलेल्या बाजार संकुलातील इमारती मधील गाळ्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून गाळ्यांच्या वापर अनेक वर्षांपासून करण्यात येत नसल्याने तेथील गाळयांचा गैरवापर सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाजार संकुलाच्या इमारतीचा वापर सिडको करीत नसल्याने सदर इमारतीची जागा सामाजिक किंवा लोकपयोगी उपक्रमांकरिता नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरिकांची असल्याने या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांची मागणी व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) ऐरोली, सेक्टर १५ मध्ये सिडकोने ४८ गाळ्यांचे व्यापारी संकुल बांधले असून त्यापैकी २६ गाळे सन १९९७ ते सन २००० या कालावधीत वाटप व करारनाम्याद्वारे भाजी विक्रेत्यांना भाडेतत्वावर वाटप करण्यात आले आहेत. मात्र, सर्व गाळेधारकांनी वाटप केलेले गाळे बंद अवस्थेत ठेवले असल्याने संकुलाची दुरावस्था झालेली आहे. दरम्यान संकुलाची जागा सामाजिक अथवा लोकपयोगी उपक्रमासाठी नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याच्या मागणीचे कोणतेही निवेदन सिडको कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

मात्र, गाळयांची दुरावस्था व होणारा गैरवापर लक्षात घेता करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार तपासणी करुन यथायोग्य सिडकोमार्फत निर्णय घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अनधिकृत गॅस सिलेंडर पुरवठादारांवर कारवाई करण्याबाबत

**(५६) * १०४९७७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कमला मिलमधील अग्निकांडानंतर महानगरपालिकेच्या वतीने मुंबईतील ७०० हॉटेलवर केलेल्या कारवाईमध्ये हॉटेलसमध्ये परवानगीपेक्षा अधिक प्रमाणात अनधिकृत गॅस सिलेंडर जप्त केले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताब्यात घेतलेले हॉटेलसमधील अनधिकृत गॅस सिलेंडर ठेवण्यासाठी महानगरपालिकेकडे व्यवस्था नसल्यामुळे अतिशय धोकादायक असलेले गॅस सिलेंडर संबंधित कंपन्यांना परत करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे अनधिकृत गॅस सिलेंडर पुरवणाऱ्या पुरवठादारांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार अशा प्रकारे अनधिकृत गॅस सिलेंडर पुरविणाऱ्या पुरवठादारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कमला मिलमधील अग्निकांडानंतर मुंबईतील हॉटेल्स, रेस्टॉरंटस, पब्ज इत्यादी विरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कारवाईत गॅस सिलेंडर्स अवैधरित्या वापरणे, परवानगीपेक्षा

जास्त गॅस सिलेंडर्स संग्रहीत करणे या कारणांमुळे महानगरपालिकेमार्फत सुमारे २६५२ गॅस सिलेंडर्स जप्त करण्यात आले आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जप्त केलेले अनधिकृत सिलेंडर्स ठेवण्यास पुरेशी सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने तसेच भविष्यात एखादी दुर्घटना घडून संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी भारत सरकारच्या उपक्रमातील संबंधित गॅस कंपन्यांना सिलेंडर्स परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३), (४) व (५) अशा प्रकारे अनधिकृत गॅस सिलेंडरचा पुरवठा करणाऱ्या वितरकांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत तसेच, पदपथ/रस्त्यावर खाद्यपदार्थ बनविण्यासाठी गॅस सिलेंडर्सचा अनधिकृत/परवान्यापेक्षा जास्त वापर होत असल्याचे आढळून आल्याने योग्य ती खबरदारी घेण्याबाबत भारत सरकारच्या उपक्रमातील गॅस कंपन्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

-----------------

## मुंबई विकास आराखडयानुसार खुल्या मैदानासाठी राखीव असलेल्या भूखंडावर इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(५७) * १०९६४५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किरोळ, पंतनगर, घाटकोपर (मुंबई) येथील सीटी सर्व्हे नं.५७४०, फायनल प्लॉट नं.३५२, टीपीएस नं.३ या भूखंडावर सन १९९१ च्या मुंबई विकास आराखडयानुसार खुल्या मैदानासाठी राखीव असलेल्या आर-१ या भूखंडावर ५ मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे तसेच आर-२ भूखंडावर १६ मजली ३ इमारतीच्या बांधकाम प्रस्तावास मुंबई महानगरपालिका इमारत प्रस्ताव विभागाने मान्यात दिल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू भूखंडावर म्हाडाच्या १३ इमारतीत ४१६ कुटुंबे राहत असून त्यांना खेळणे, व्यायाम करणे, जॉगींग करणे आदी सार्वजनिक वापरासाठी, भूखंड राखीव असताना, तसेच सदर एकूण भूखंडाच्या

क्षेत्रफळापैकी, २५ टक्के खुली जागा ठेवून प्रकल्पास मान्यता देणेबाबत, आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी स्पष्ट शेरा दिला असतानाही इमारत प्रस्ताव विभागाचे अधिकारी यांनी सदरहू शेऱ्याचे पालन न करता ५ मजली इमारत बांधण्यास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, महानगरपालिका आयुक्तांचे आदेश तसेच डी.सी.रुल आणि महानगरपालिका अधिनियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिका व म्हाडाच्या तसेच विकासक यांच्याविरूध्द शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबईच्या सन १९९१ च्या मंजूर विकास आराखडयानुसार सदर भूखंडावर कोणत्याही प्रकारचे आरक्षण दर्शविलेले नाही. सदर भूखंड हे म्हाडाच्या घाटकोपर येथील अभिन्यासामधील आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्या ठिकाणी बांधकाम परवाने दिलेले आहेत.

(२) प्रस्तुत प्रकरणी महापालिका आयुक्त यांनी "ले आऊटमध्ये आवश्यक असलेल्या मनोरंजनाची मोकळी जागा ठेवली आहे हे बघणे" असे शेरे नोंदविलेले होते. सदर अभिन्यासामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार खेळाचे मैदानाकरिता व करमणुकीच्या मैदानाकरिता आवश्यक भूखंड सोडण्यात आलेला आहे, असे म्हाडाकडून स्पष्ट करणेत आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.